ठाणे, मंगळवार दि. २४ सप्टेंबर २०२४ वर्ष : १३, अंक : १४७ , पाने : ४, किंमत : २ रुपये Maharashtra Samrat Maharashtra Samrat dainikmahasamrat@gmail.com Reg. No. THC/58/2024-2026

सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच!®

# दैनिक महाराष्ट्र सम्राट

मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई, रायगड, पालघर, पुणे

संपादक : चंद्रकांत भोईटे

अग्रलेख

**बदलापूर प्रकरणातील आरोपीचा मृत्यू**

बदलापूर येथील एका शाळेत एका चिमुरडीवर लैंगिक अत्याचार घडल्याची घटना घडली होती. या प्रकरणातील आरोपीवर पोलिसांनी गोळ्या झाडल्याने तो मृत झाला.......पान २ वर

ई-पेपरसाठी नियमित पहा...
ePaper PDF
www.maharashtrasamrat.com

**तापमान**

कमाल ३१° से | किमान २६° से

**बाजार**

सोने ७४,४५० | चांदी ९१,०००

**डोकं खाजवा** -अशोक सुतार



मुलगा व्हॉट्स अपवर ग्रुप अॅडमिन आहे, हेच चिंतेचे कारण आहे, डॉक्टर साहेब........



# बदलापूरमधील आरोपी अक्षय शिंदेचा मृत्यू
# आत्महत्या की एन्काऊंटर ?




बदलापूर लैंगिक अत्याचार प्रकरणामध्ये आरोपी अक्षय शिंदेला फाशी द्यावी या मागणीसाठी बदलापूरकरांनी सहा तासांहून अधिक काळ मध्य रेल्वेची वाहतूक रोखून धरली होती. या प्रकरणात अटकेत असलेला हा आरोपी अक्षय शिंदेचा मृत्यू झाला आहे.

## कोण आहे अक्षय शिंदे?

- बदलापूर अत्याचार प्रकरणातील अक्षय शिंदे प्रमुख आरोपी आहे
- अक्षय हा शाळेत सफाई कामगार म्हणून काम करतो.
- अक्षय शिंदे २४ वर्षांचा आहे.
- शाळेत स्वच्छता ठेवण्याबरोबर मुलांना वॉश रुमला घेऊन जाण्याचं काम अक्षय शिंदे करायचा.
- मुलं अक्षय शिंदे काठीवाला दादा म्हणून ओळखायची.
- आऊट सोर्सिंगच्या माध्यमातून अक्षय शिंदेला या शाळेत नोकरी मिळालेली.
- अक्षय शिंदेला २६ ऑगस्टपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

**बदलापूर लैंगिक अत्याचार प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदेचा मृत्यू झाला आहे. अक्षय शिंदेने पोलिसांच्या बंदुकीतून स्वत:वर गोळी झाडून घेत आत्महत्या केली की एन्काऊंटर करण्यात आला याबाबत तर्क-वितर्क लावले जात आहेत. पोलीस ट्रान्झिट रिमांडसाठी तळोजा जेलमध्ये नेत असताना हा सगळा प्रकार घडला.**

सूत्रांच्या माहितीनुसार, अक्षय शिंदेने तळोजा जेलमध्ये उपस्थित पोलीस कर्मचाऱ्याची बंदूक खेचण्याचा प्रयत्न केला आणि तीन गोळ्या झाडल्या. या झटापटीत एका पोलीस कर्मचाऱ्यालाही गोळी लागली आणि जखमी झाला. यावेळी पोलिसांनी स्वसंरक्षण करताना त्याच्यावर गोळी झाडली ज्यामध्ये तो जखमी झाला होता. अक्षय शिंदेची कोठडी आज संपली असून त्याला कोर्टात नेलं जात होतं. अक्षय शिंदेला सध्या उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. तिथे उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला.

अक्षय शिंदेने गोळ्या झाडल्यानंतर पोलिसांनी प्रत्युतरात गोळीबार केला. गोळी लागल्याने अक्षय गंभीर जखमी झाला होता. त्याला कळवा रुग्णालयात नेण्यात आलं होतं जिथे त्याचा मृत्यू झाला. दरम्यान पोलीस अधिकारी निलेश मोरे यांना गोळी लागली असून ते जखमी आहेत. अक्षय शिंदेने निलेश मोरे यांचीच बंदूक खेचली होती. मुंब्रा बायपासजवळ हा सगळा प्रकार घडला आहे.

## गृहमंत्र्यांनी कुणाला वाचवण्यासाठी अक्षय शिंदेचा एन्काऊंटर केला? , बदलापूर'मधील सूत्रधार कधीही समोर येणार नाहीत



मुंबई : बदलापूर अत्याचार प्रकरणातील मुख्य आरोपी अक्षय शिंदेचा मृत्यू झाला आहे. आरोपीला ट्रान्सिट रिमांडसाठी नेत असताना त्याच्या एन्काऊंटर झाल्याची माहिती आहे. पोलिसांनी स्वः संरक्षणासाठी त्याच्यावर गोळ्या झाडल्या. पण हे एन्काऊंटर बोगस असून या प्रकरणातील इतर आरोपींना वाचवण्यासाठी पोलिसांनी हे घृणास्पद कृत्य केल्याचा आरोप राज्याचे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी केला. तसेच राज्याचे गृहमंत्र्यांनी कुणाला वाचवण्यासाठी पोलिसांना हे आदेश दिले असा सवालही त्यांनी विचारला. (पान २ वर)

## याची न्यायिक चौकशी झालीच पाहिजे!– विजय वडेट्टीवार



अक्षय शिंदे याने गोळी झाडून घेणे म्हणजे पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न आहे का?, अक्षय शिंदे याने गोळी नेमकी कशी झाडली?, आरोपी अक्षय पोलिसांच्या ताब्यात असताना त्याचे हात बांधले नव्हते का? त्याला बंदूक कशी काय त्याला मिळाली? पोलीस इतके बेसावध कसे असू शकतात? असे प्रश्न वडेट्टीवार यांनी केले आहेत. या प्रकरणात पोलिसांच्या भूमिकेवर आपला विश्वास नसल्याचे सांगतानाच बदलापूर प्रकरणात एकीकडे संस्थाचालक भाजपशी सबंधित असताना संस्थाचालकांवर कारवाई होत नाही, दुसरीकडे आज आरोपी अक्षय शिंदे स्वतःवर गोळी घालून घेतो हे अतिशय धक्कादायक आणि संशयास्पद असल्याचे म्हटले आहे. आमची मागणी आहे, आता या प्रकरणाची न्यायिक चौकशी झालीच पाहिजे!

## थोडक्यात घडामोडी

### मुंबईच्या 'लोकल'मध्ये आढळली बेवारस बॅग; बॅगमध्ये २० लाख कॅश, प्रवाशाचा शोध सुरू

कल्याण - आसनगाव रेल्वे स्थानकातून मुंबईच्या दिशेला जाणाऱ्या लोकलच्या मधल्या जनरल डब्यात एक बेवारस बॅग आढळून आली. कल्याण रेल्वे स्थानकात गाडी येताच कल्याण लोहमार्ग पोलिसांनी ती बॅग जप्त करून पाहणी केली असता त्यात २० लाखांची रोकड आढळून आली. या बॅगेचा मुळ मालक कोण याचा शोध रेल्वे पोलिस घेत आहेत.

रविवारी रात्री २१.५७ वाजण्याच्या सुमारास आसनगाव रेल्वे स्टेशन येऊन अप दिशेकडील सीएसएमटी लोकलच्या मधल्या जनरल डब्यामध्ये एका प्रवाशाला बेवारस बॅग आढळून आली. कल्याण रेल्वे पोलिसांना प्रवाशाने याविषयी माहिती दिली असता पोलिसांनी गाडीची चेकींग करुन बॅग ताब्यात घेतली. दोन पंचांसमक्ष बॅगेची पाहणी केली असता त्यामध्ये २० लाखाची रोख रक्कमेसह औषधाचा बॉक्स आढळून आला. या प्रकरणी कल्याण लोहमार्ग पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरिक्षक पंढरी कांदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरिक्षक खेतमाळी आणि त्यांचे सहकारी बॅगच्या मालकाचा शोध घेत आहेत.

### निवडणूक आयोगाचा अजब कारभार
### दुबार मतदार घटण्याऐवजी वाढविले..


राजन विचारे यांचा गंभीर आरोप

(सविस्तर वृत्त पान २)

# सरपंच आणि उपसरपंचांच्या मानधनात दुप्पट वाढ

**राज्य सरकारचे २४ मोठे निर्णय**

मुंबई - मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली आज मंत्रिमंडळाची महत्वाची बैठक पार पडली. या बैठकीत राज्यातील विविध विषयांसंदर्भात चर्चा करण्यात आली. तसेच यावेळी काही महत्वाचे निर्णय घेण्यात आले. याचवेळी राज्यातील सरपंच आणि उपसरपंचांचे मानधन दुप्पट करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या संदर्भातील माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी माध्यमांशी बोलताना दिली. दरम्यान, सरपंच आणि उपसरपंचांच्या मानधनामध्ये वाढ करण्याच्या (पान २ वर)



## सरपंच आणि उपसरपंचांचे मानधन कसे असणार?

राज्यातील सरपंच उपसरपंच यांच्या मानधनात दुप्पट वाढ करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. यानुसार आता ज्या ग्रामपंचायतीची लोकसंख्या २ हजार आहे, त्या ग्रामपंचायतीच्या सरपंचाचं मानधन ३ हजारांवरुन ६ हजार रुपये करण्यात आले आहे. तसेच उपसरपंचाचे मानधन देखील दुप्पट करण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच २ हजार ते ८ हजारांच्या दरम्यान लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायतींच्या सरपंचाचं मानधन ४ हजारांवरून ८ हजार रुपये करण्यात आले, तर तेथील उपसरपंचांचं मानधन १५०० रुपयांवरून ३ हजार करण्यात आले. याबरोबरच ज्या ग्रामपंचायतीची लोकसंख्या ८ हजारांपेक्षा जास्त आहे, तेथील सरपंचाचं मानधन ५ हजारांवरून १० हजारांपर्यंत करण्यात आले आहे, तेथील उपसरपंचाचे मानधन २ हजारांवरून आता ४ हजारांपर्यंत करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे.

## मंत्रिमंडळ बैठकीत कोणते निर्णय झाले?

- लोहगाव विमानतळाचे नाव जगद्गुरु संत तुकाराम महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ पुणे असे करण्याचा निर्णय.(सामान्य प्रशासन)
- बालगृहे निरीक्षणगृहातील कर्मचाऱ्यांना आश्वासित प्रगती योजना : शिक्षकांना वरिष्ठ निवड श्रेणी (महिला व बाल विकास विभाग)
- धान उत्पादकांना दिलासा : आता प्रतिक्विंटल चाळीस रुपये अतिरिक्त भरडाई दर (अन्न नागरी पुरवठा विभाग)
- कुणबीच्या तीन पोटजातींचा इतर मागासवर्ग यादीमध्ये समावेश (इतर मागास बहुजन कल्याण)
- जुन्नर येथे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय (विधी व न्याय)
- शिरूर ते छत्रपती संभाजीनगर ग्रीनफिल्ड द्रुतगती मार्ग. १४८६ कोटीचा प्रकल्प (सार्वजनिक बांधकाम)
- करदात्यांचे हित लक्षात घेऊन जीएसटी अधिनियमात सुधारणा (वित्त)
- यवतमाळ, जळगांव जिल्ह्यातील सूतगिरणींना थकबाकी परतफेडीसाठी हप्ते (वस्त्रोद्योग)
- क्रिकेटपटू अजिंक्य रहाणे यांना सूसज्ज क्रीडा सुविधा उभारण्यासाठी वांद्रेतला भूखंड (महसूल)
- ग्रामसेवक आणि ग्रामविकास अधिकारी पदांचे एकत्रीकरण करून ग्रामपंचायत अधिकारी पद (ग्राम विकास)
- राज्यातील सरपंच उपसरपंच यांच्या मानधनात दूप्पट वाढ (ग्रामविकास विभाग)
- मुंबई उच्च न्यायालयाच्या वांद्रेतील नव्या संकुलाचे बांधकाम राज्याचा महत्त्वपूर्ण प्रकल्प (सार्वजनिक बांधकाम)
- हरित हायड्रोजन धोरणात अँकर युनिटची पारदर्शकपणे निवड करणार (ऊर्जा)
- एसटी महामंडळाच्या जमिनी बीओटी तत्वावर विकसित करणार : साठ वर्षाचा भाडेपट्टा करार (परिवहन)
- ब्राह्मण समाजासाठी परशुराम आर्थिक विकास महामंडळ (नियोजन)
- राजपूत समाजासाठी वीर शिरोमणी महाराणा प्रताप आर्थिक विकास महामंडळ (नियोजन)
- राज्यातील १४ आयटीआय संस्थांचे नामकरण (कौशल्य विकास)
- छत्रपती संभाजीनगर, नागपूर येथील विधी विद्यापीठांना सात कोटी रूपये (उच्च व तंत्रशिक्षण)
- अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंना थेट नियुक्ती देण्याच्या निर्णयात सुधारणा (क्रीडा विभाग)
- जलसंपदा कर्मचाऱ्यांना वरिष्ठ वेतनश्रेणी (जलसंपदा विभाग)
- श्रीरामपूर तालुक्यातील मौजे हरेगाव येथील शेती महामंडळाच्या जमिनी मुळ मालकांना परत करणार (महसूल)
- दूध अनुदान योजना सुरु राहणार, उत्पादकांना गायीच्या दूधासाठी लीटरमागे सात रुपयांचे अनुदान (दूग्ध व्यवसाय विकास)
- महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक धोरण जाहीर (सांस्कृतिक कार्य विभाग)

## नवी मुंबईमधील प्रकल्पग्रस्तांनी गरजेपोटी केलेली बांधकामे
# नियमित करण्याचा अखेर निर्णय...

नवी मुंबई : नवी मुंबई विमानतळाला दि.बा.पाटील यांचे नाव देण्याचा प्रलंबित निर्णय, अक्षता म्हात्रे बलात्कार आणि खून प्रकरण, एमएमआरडीए-सिडको यासारख्या शासकीय संस्थांकडून नव्या नगरांच्या निर्मीतीसाठी होत असलेले भूसंपादन यामुळे नवी मुंबईसह संपूर्ण ठाणे जिल्ह्यातील आगरी-कोळी भूमीपुत्र समाजातील अस्वस्थता वाढत असताना राज्यातील महायुती सरकारने नवी मुंबई, पनवेल, उरण पट्ट्यातील प्रकल्पग्रस्तांनी उभारलेली वाढीव बांधकामे नियमीत करण्याचा निर्णय घेत निवडणुकांच्या तोंडावर मोठे राजकीय पाउल उचलल्याचे आता स्पष्ट होऊ लागले आहे. भाजप आणि शिंदेसेनेतील अस्वस्थ भूमीपुत्र नेत्यांनाही या निर्णयामुळे थोपविता येईल अशी दुहेरी खेळी या निर्णयामागे असल्याचे बोलले जात आहे. नवी मुंबई, उरण, पनवेल परिसरात विधानसभेच्या चार जागा असून या भागातील

### प्रकल्पस्तांच्या मतांसाठी महायुतीची अखेरची धडपड

### महायुतीत श्रेयवाद ?

ठाण्याचे खासदार नरेश म्हस्के यांनी या प्रश्नावर निर्णायक मध्यस्ती करताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना हा निर्णय घेण्यास राजी केल्याचे वृत्त आहे. गणेशोत्सवाच्या काळात या प्रश्नावर नगरविकास विभागाचे सचिव असीम गुप्ता यांच्यासोबत त्यांनी घेतलेल्या बैठकीनंतर नवी मुंबई, पनवेल, उरणमधील भाजप आमदार अस्वस्थ झाले होते. या आमदारांच्या आग्रहास्तव असीम गुप्ता यांनी या प्रश्नावर स्वतंत्र्य बैठक बोलावली. त्यामुळे काहीकाळ शिंदेसेना आणि भाजप असा सामना या मुद्यावर रंगला होता. बेलापूरच्या भाजप आमदार मंदा म्हात्रे या मुद्दयावर मुख्यमंत्र्यांना स्वतंत्र्यपणे भेटल्या. त्यामुळे महायुतीच्या नेत्यांमध्येच श्रेयवाद रंगल्याचे चित्र असताना रविवारी कोळी भवनाच्या शुभारंभासाठी नवी मुंबईत आलेल्या मुख्यमंत्र्यांनी या निर्णयावर माझी स्वाक्षरी झाली आहे, असे जाहीर केले होते.



या प्रश्नावर महायुतीच्या नेत्यांमध्ये कोणताही श्रेयवाद नाही. लोकसभा निवडणुकीत हा प्रश्न सोडवू असे आश्वासन मी दिले होते. ते पुर्ण करण्यासाठी पहिल्या दिवसापासून कामाला लागलो. मुख्यमंत्र्यांनी हा निर्णय तातडीने घेतला. त्यामुळे निवडणुकांच्या तोंडावर हा निर्णय आम्ही घेतला असे म्हणता येत नाही. प्रश्न सुटला हे महत्वाचे आणि त्यासाठी आम्ही घेतलेल्या मेहनतीला यश आले याचे समाधान आहे. – **नरेश म्हस्के, खासदार ठाणे**

## ब्राह्मण समाजासाठी महामंडळ मंजूर

मुंबई : राज्य सरकारच्या मंत्रिमंडळ बैठकीत आज महत्त्वाचे २४ निर्णय घेण्यात आले आहेत. त्यामध्ये, कुणबीच्या तीन पोटजातींचा इतर मागास प्रवर्गात (OBC) समावेश करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तर, ब्राह्मण आणि राजपूत समाजासाठी सरकारने नव्या महामंडळाला कॅबिनेटची मंजुरी दिली आहे. त्यामध्ये, ब्राह्मण समाजासाठी परशुराम आर्थिक विकास महामंडळाला मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली आहे. ब्राह्मण समाजाच्या विकासासाठी या महामंडळाची स्थापना (पान २ वर)

## लाडकी बहीण योजनेचा तिसरा हप्ता २९ तारखेला मिळणार

**मुंबई : मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसंदर्भात मोठी माहिती समोर आली आहे. या योजनेचा तिसऱ्या हप्त्याचे वितरणे येत्या २९ सप्टेंबर रोजी होणार आहे. याबाबतची अधिकृत माहिती महिला व बालविकास कल्याण विभागाच्या मंत्री आदिती तटकरे यांनी माहिती दिली आहे. या निर्णयानंतर आता लाडकी बहीण योजनेच्या पात्र महिलांना प्रतिमहा १५०० रुपये या हिशोबाने पैसे मिळणार आहेत.**

### ३० सप्टें.पर्यंत अर्ज करता येणार

लाडकी बहीण योजनेसाठी अर्ज करण्याची प्रक्रिया अजूनही चालूच आहे. येत्या ३० सप्टेंबरपर्यंत महिलांना या योजनेसाठी अर्ज करता येणार आहे.



### आदिती तटकरे यांनी काय माहिती दिली आहे?

सरकारच्या या निर्णयाबाबत मंत्री आदिती तटकरे यांनी सविस्तर माहिती दिली आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा तिसरा कार्यक्रम २९ सप्टेंबर रोजी रायगड येथे होणार आहे. हा तिसरा राज्यस्तरीय कार्यक्रम कार्यक्रम आहे. या कार्यक्रमात सप्टेंबरपर्यंत आलेल्या अर्जाचा लाभ वितरीत करण्यात येईल. अर्जात त्रुटी राहिल्यामुळे अनेक महिलांना अद्याप या योजनेचा लाभ मिळालेला नाही. त्यामुळे या तिसऱ्या हप्त्यात अशा महिलांना लाभ दिला जाणार आहे. या तिसऱ्या हप्त्यात एकूण २ कोटी महिलांना लाभ दिला जाईल, अशी माहिती आदिती तटकरे यांनी दिली.

### आतापर्यंत दोन हप्ते आले...

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योनजेसाठी पात्र ठरलेल्या आणि कागदपत्रांमध्ये कोणतीही त्रुटी नसलेल्या महिलांना आतापर्यंत जुलै आणि ऑगस्ट महिन्याचे दोन हप्ते आलेले आहेत. या दोन हप्त्याचे काही महिलांच्या बँक खात्यात ३००० रुपये आले आहेत. सरकारने पुणे शहरात मोठ्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. त्या कार्यक्रमात रक्षबंधनाच्या पार्श्वभूमीवर या योजनेचा अधिकृतपणे शुभारंभ करण्यात आला होता. त्यामुळे ऑगस्ट महिन्यात काही महिलांना दोन महिन्यांचे तीन हजार रुपये आले होते. तर दुसरा कार्यक्रम नागपूर येथे आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाच्या माध्यमातून लाडकी बहीण योजनेच्या दुसऱ्या हप्त्याचे वाटप चालू करण्यात आले होते. आता रायगड येथे सरकारचा तिसरा कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमाच्या माध्यमातून लाडकी बहीण योजनेच्या तिसऱ्या हप्त्याचे वाटप होणार आहे.

## मिरा भाईंदर मध्ये पहिल्यांदा भव्य भागवत सत्संग सनातन राष्ट्रसंमेलनाचे आयोजन

**ठाणे - आमदार प्रताप सरनाईक यांनी दि. २८ सप्टेंबर ते दि. ३० सप्टेंबर दरम्यान भागवत सत्संग 'सनातन राष्ट्रसंमेलना'चे आयोजन केले आहे. स्व. बाळासाहेब ठाकरे मैदान, भाईंदर येथे दररोज दुपारी ३.०० ते सायंकाळी ७.०० या वेळेत हा सत्संग संपन्न होईल. मिरा-भाईंदरच्या नागरिकांना या भागवत सत्संग सनातन राष्ट्रसंमेलनाच्या माध्यमातून भक्तिमय वातावरणाची अनुभूती मिळणार आहे. मिरा भाईंदर मध्ये पहिल्यांदाच इतक्या भव्य प्रमाणात या संमेलनाचे आयोजन करण्यात आले असून शहरात उत्साहाचे वातावरण आहे.**

या भागवत सत्संग सनातन राष्ट्रसंमेलनास प्रमुख प्रवचनकर्ते म्हणून श्री श्री अनिरुद्धाचार्य जी महाराज उपस्थित राहणार आहेत. तीनही दिवस त्यांचे प्रवचन होईल. तर तिसऱ्या दिवशी प. पू. बालयोगी श्री सदानंद महाराज, अनंत श्री विभूषित श्री अयोध्या कोसलेस सदन पीठाधीश्वर जगद्गुरू रामानुजाचार्य स्वामी श्री वासुदेवाचार्य 'विद्याभास्कर' जी महाराज, अनंत श्री विभूषित श्री पश्चिमाम्नाय द्वारकाशारदापीठाधीश्वर जगद्गुरू शंकराचार्य स्वामीश्री सदानन्द सरस्वती जी महाराज, स्वामी गोविंद देव गिरी जी महाराज कोषाध्यक्ष - राम जन्मभूमि तीर्थ क्षेत्र न्यास (अयोध्या), गजानन ज्योतकर गुरूजी अयोध्या श्री राम मंदिर प्राणप्रतिष्ठा पुरोहित आदींचेही या संमलेनात प्रवचन होणार आहे. मिरा-भाईंदरमधील सर्व नागरिकांनी या कार्यक्रमास आवर्जून उपस्थित राहावे ही विनंती असे आवाहन आयोजक आमदार प्रताप सरनाईक यांनी केले आहे. दि. ३० सप्टेंबर रोजी राज्याचे मुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे साहेबांच्या प्रमुख उपस्थितीत सत्संगामध्ये सहभागी झालेल्या संत महात्म्यांचा सन्मान करण्यात येणार आहे. दि. २८ सप्टेंबर रोजी हिंदू जनजागरण यात्रा नवघर मैदान ते स्व. बाळासाहेब ठाकरे मैदानापर्यंत काढण्यात येणार आहे. तसेच दि. ३० सप्टेंबर रोजी सायं. ५.०० वाजता (पान २ वर)




(छाया - मनोज सिंह)

# संपादकीय...



संपादक-चंद्रकांत भोईटे

## बदलापूर प्रकरणातील आरोपीचा मृत्यू

बदलापूर येथील एका शाळेत एका चिमुरडीवर लैंगिक अत्याचार घडल्याची घटना घडली होती. या प्रकरणातील आरोपीवर पोलिसांनी गोळ्या झाडल्याने तो मृत झाला आहे. बदलापूर शाळा लैंगिक अत्याचार प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदेने पोलिसांवर गोळीबार केला केला आहे. ठाणे क्राइम ब्रँचच्या टीमकडून घटनास्थळाची पाहणी करण्यासाठी घेऊन जात असताना ही घटना घडली. यावेळी अक्षयने पोलीसांजवळील बंदूक हिसकावून त्यांच्या दिशेने गोळीबार केला. यावेळी प्रत्युत्तरादाखल पोलिसांनीही गोळीबार केला. पोलिसांच्या गोळीबारात आरोपी अक्षय शिंदे ठार झाल्याची माहिती आहे. या चकमकीत सहायक पोलिस निरीक्षक निलेश मोरे जखमी झाले आहेत. अशा प्रकारे या प्रकरणावर सध्या तरी पडदा पडल्याचे दिसत आहे. ठाणे क्राइम ब्रँचच्या टीमने बदलापूर लैंगिक छळ प्रकरणातील आरोपी अक्षयला तळोजा जेलमधून ताब्यात घेतले होते. तसेच त्याला दुपारच्या वेळी घटनास्थळाची पाहणी करण्याकरीता घेऊन जात होते. यावेळी मुंब्रा बाह्यवळण मार्ग येथे पोहोचताच अक्षयने पोलिसांकडून बंदूक हिसकावली आणि पोलिसांच्या दिशेने गोळीबार केला. प्रत्युत्तर म्हणून पोलिसांनीही त्याच्या दिशेने गोळीबार केला. पोलिसांच्या गोळीबारात अक्षय जखमी झाला. त्यानंतर त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी त्याला मृत घोषीत केले. या घटनेनंतर आरोपी अक्षय शिंदेच्या आईने प्रतिक्रिया दिली आहे की, माझा मुलगा असे काही करणार नाही ( बदलापूरच्या घटनेबाबत ) माझा मुलगा एकदम गरीब आहे, अशी घाण सवय त्याला लावलेली नाही, माझा मुलगा फटाकाही वाजवत नाही, तो गाड्यांना घाबरायचा, असे त्या म्हणाल्या. बदलापूर शाळा लैंगिक अत्याचार प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदेवर सुरुवातीला गुन्हा दाखल करण्यास बदलापूर पोलिसांनी अक्षम्य उशीर केला होता. त्यावेळी संतप्त जमावाने आरोपीला आमच्या ताब्यात द्या, असे म्हणत शहर व रेल्वे स्थानक परिसरात मोठे आंदोलन केले होते. राज्यात अनेक ठिकाणी लोकांनी आंदोलने केली होती. सदर आरोपीवर जलदगती न्यायालयात खटला चालवून त्वरित फाशी द्यावी, अशी मागणी जनतेकडून केली गेली होती. तसेच कोणताही वकील त्याचे वकीलपत्र घेणार नाही, असे वकिलांच्या संघटनांनी ठरवले होते. अक्षय शिंदे याला वाचविण्यासाठी अनेक जण प्रयत्नशील दिसत होते. परंतु लहान मुलीवर लैंगिक अत्याचार करणाऱ्या अक्षय शिंदेंबद्दल राज्यातून संताप व्यक्त होत होता. पोलिसांनी अक्षय शिंदे याचा मृत्यू कसा झाला, हे कथन केले आहे. मानवतेला काळिमा फासणारे हे नराधम समाजात ताठ मानेने वावरतात, हेच समाजासाठी धोकादायक आहे. परंतु आरोपी अक्षय शिंदेने पोलिसांसिकडून बंदूक हिसकावून गोळी झाडली हे खरे असेल तर ही गुन्हेगारी मानसिकताच त्याच्या नाशाला जबाबदार ठरली असे म्हणता येईल. सोमवारी पोलीस सदर आरोपीला तळोजा कारागृहातून बाहेर घेऊन जात असताना त्याने पोलीस अधिकाऱ्याची बंदूक हिसकावून पोलिसांवर गोळ्या झाडण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी पोलिसांनी स्वसंरक्षणार्थ अक्षय याच्यावर गोळीबार करत त्याला ठार केले. पोलीस वाहनातच हा प्रकार घडला असून यामध्ये सहायक पोलिस निरीक्षक निलेश मोरे यांच्या पायाला गोळी लागल्याने ते जखमी झाले आहेत. मात्र, डॉक्टरांनी आरोपी अक्षय शिंदेला मृत घोषीत केले. बदलापुर येथील एका शाळेतील दोन चिमुकल्या विद्यार्थिनीवर अत्याचार झाल्याचे प्रकरण समोर आले होते. या घटनेनंतर बदलापूर मध्ये नागरिकांनी रेल्वे रुळावर उतरून आंदोलन केले होते. या आंदोलनामुळे तणावाचे वातावरण होते. या आंदोलनाची दखल घेत राज्य शासनाने या प्रकरणाचा तपास करण्यासाठी एसआयटी नेमली होती. या एसआयटीच्या टीमने या प्रकरणाचा तपास करून कल्याण न्यायालयात आरोपपत्र दाखल केले होते. असे असतानाच अक्षय शिंदे याच्या दुसऱ्या पत्नीने दिलेल्या तक्रारीच्या आधारे पोलिसांनी त्याच्या विरोधात अनैसर्गिक लैंगिक संबंध प्रस्थापित केल्याप्रकरणी गुन्हाही दाखल केला होता. आरोपी अक्षय शिंदेच्या मृत्यूबद्दल भवितव्यात वाद होतील किंवा होणारही नाहीत. परंतु अशा नराधमांमुळे मुली व स्त्रिया असुरक्षित आहेत, हे वास्तव आहे.

## ......नियमित करण्याचा अखेर निर्णय

**(पान १ वरून)** आगरी-कोळी समाजातील प्रकल्पग्रस्तांची अस्मिता ठाणे आणि रायगड जिल्ह्यातील गावागावांमधून पसरलेल्या या समाजाशी जोडली गेली आहे. नवी मुंबई विमानतळाला प्रकल्पग्रस्तांचे दिवंगत नेते दि.बा.पाटील यांचे नाव द्यावे यासाठी उभ्या करण्यात आलेल्या आंदोलनाला ठाणे आणि रायगड जिल्ह्यातील लाखो आगरी-कोळी समाजबांधवांनी साथ दिली होती. राज्यात महाविकास आघाडीचे सरकार असताना या आंदोलनाची हाक देण्यात भाजपचे या दोन जिल्ह्यातील स्थानिक नेते आघाडीवर होते. त्यामुळे उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्री पदावर पायउतार होताना अखेरच्या टप्प्यात नवी मुंबई विमानतळाला दि.बा.पाटील यांचे नाव देण्याचा निर्णय घेत असल्याचे जाहीर केले. पुढे एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री पदाची धुरा खांद्यावर घेताच पहिल्याच मंत्री मंडळ बैठकीत हा निर्णय नव्याने घेत असल्याचे जाहीर केले. नवी मुंबई विमानतळाच्या नामकरणाचा हा मुद्दा अजूनही केंद्र सरकारच्या पातळीवर प्रलंबित आहे.

■ **गरजेपोटी बांधकामांचा मुद्दा निर्णायक** – नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत ठाणे आणि रायगड जिल्ह्यातील मतदारसंघात महायुतीच्या उमेदवारांना विजय मिळाला असला तरी ग्रामीण पट्टयात झालेले मतदान महायुतीच्या उमेदवारांची चिंता वाढविणारे ठरले. रायगड जिल्ह्यातील उरण विधानसभा मतदारसंघात महायुतीचा उमेदवार १५ हजारांपेक्षा अधिक मतांनी पिछाडीवर पडला. पनवेल विधानसभा क्षेत्रात महायुतीला मोठे मताधिक्य मिळाले खरे मात्र येथील ग्रामीण भागात महाविकास आघाडीने तुलनेने चांगली मते घेतल्याचे पहायला मिळाले. ऐरोली-बेलापूर या दोन्ही मतदारसंघात काही गावांमध्ये महाविकास आघाडीने मताधिक्य घेतल्याचे पहायला मिळाले. कल्याण लोकसभा मतदारसंघात डॉ.श्रीकांत शिंदे यांनी भजन महोत्सव, हरीपठण कार्यक्रमांचा धडाका लावत आगरी-कोळी समाजातील मतांचे उत्तम ध्रुवीकरण घडविले खरे मात्र विधानसभा निवडणुकांमध्ये या निकालाची पुनरावृत्ती करण्याचा प्रयत्न महायुतीच्या गोटात सुरु आहे. त्यामुळे प्रकल्पग्रस्तांनी गरजेपोटी बांधलेली घरे नियमीत करण्याचा निर्णय घेत विधानसभा निवडणुकांपुर्वी शिंदे-फडणवीस या दोन नेत्यांनी महत्वाची राजकीय खेळी केल्याची चर्चा आहे.

## मीरा भाईंदर मध्ये पहिल्यांदाच भव्य भागवत सत्संग सनातन राष्ट्रसंमेलनाचे आयोजन

**(पान १ वरून)** नवघर येथील हनुमान मंदिर ते स्व. बाळासाहेब ठाकरे मैदानापर्यंत भव्य कलश यात्रा काढण्यात येईल. या यात्रेत ५१०० महिला सहभागी होणार आहेत. या कार्यक्रमाचा समारोप माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या हस्ते होईल.

या भागवत सत्संगासाठी स्व. बाळासाहेब ठाकरे मैदानात ४० ते ५० हजार लोकांसाठी वातानुकूलित डोम मंडप उभारण्यात येत आहे. सुरक्षेच्या दृष्टीकोनातून १०० महिला व १०० पुरुष सेवक मदतीसाठी उपलब्ध असणार आहेत. सुरक्षेच्या संबंधी योग्य खबरदारी घेण्यात आली आहे, असे आमदार प्रताप सरनाईक यांनी सांगितले. पहिल्यांदाच होणाऱ्या या भव्य दिव्य कार्यक्रमाची जोरदार तयारी आयोजक व टीम करीत आहे.

# निवडणूक आयोगाचा अजब कारभार - दुबार मतदार घटण्याऐवजी वाढविले.. राजन विचारे यांचा गंभीर आरोप

**ठाणे- शिवसेना नेते, माजी खासदार राजन विचारे यांनी ठाणे लोकसभेतील ६ विधानसभा मतदारसंघातील दुबार मतदारांची आकडेवारी घटण्याऐवजी वाढवली असल्याने आज पुन्हा एकदा जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊन संबंधित अधिकाऱ्यांची कान उघडणी करून निवडणूक आयोगाच्या प्रशासकीय यंत्रणांवर ताशेरे ओढले आहेत. निवेदन देतेवेळी संपर्क प्रमुख नरेश मणेरा, जिल्हाप्रमुख द्वारकानाथ भोईर, केदार दिघे, सुरेश मोहिते, भास्कर बैरीशेट्टी, संजय दळवी, प्रतिक राणे, अमोल हिंगे, विश्वास निकम व इतर शिवसेना पदाधिकारी उपस्थित होते.**



दिलेल्या पत्रामध्ये मागील दि. ९ ऑगस्ट २०२४ रोजी झालेल्या बैठकीत १ लाख ६६ हजार ९१० दुबार नावांची प्रिंट कॉपी व सॉफ्ट कॉपी देण्यात आली होती. त्यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी अधिकाऱ्यांना ही सर्व नावे तातडीने पडताळणी करून वगळून टाकावी असे आदेश दिले असतानाही ही नावे वगळली नाही. तर वाढवली आहेत नुकताच दि. ३० ऑगस्ट २०२४ रोजी प्रसिद्ध केलेल्या अंतिम मतदार यादीतील केलेल्या सर्वेनुसार १ लाख ९३ हजार ३०२ दुबार नावे आढळून आलेली आहेत. म्हणजे एकूण २६३९२ नावे वाढली आहेत. यावर प्रचंड नाराजी दर्शवून प्रशासकीय यंत्रणांवर ताशेरे ओढले आहेत. ही नावे वगळली नाहीत कार्यालयासमोर आंदोलन करून कोर्टात दाद मागावी लागेल असा थेट इशारा शिवसेना नेते, माजी खासदार राजन विचारे यांनी दिला आहे.

**पूर्वी** -
१४५ मिरा भाईंदर विधानसभा - ३४३१०
१४६ ओवळा माजिवडा विधानसभा - २९०८२
१४७ कोपरी पाचपाखाडी विधानसभा - २१३२०
१४८ ठाणे विधानसभा - १६७६०
१५० ऐरोली विधानसभा - ३९५९०
१५१ बेलापूर विधानसभा - २५८४८
एकूण दुबार नावे - १६६९१०

**नंतर**
१४५ मिरा भाईंदर विधानसभा - ४६८९०
१४६ ओवळा माजिवडा विधानसभा - ४५७६६
१४७ कोपरी पाचपाखाडी विधानसभा - १७९९७
१४८ ठाणे विधानसभा - १३८११
१५० ऐरोली विधानसभा - ३९७६०
१५१ बेलापूर विधानसभा - २९०७८
■ एकूण दुबार नावे - १९३३०२
■ एकूण वाढलेली दुबार नावे - २६३९२

# जनसेवक आ. संजय केळकर यांच्या जनकल्याण कार्ड योजनेला महिला भगिनींची उसळली गर्दी...

ठाण्याचे आमदार संजय केळकर यांनी त्यांच्या महिला विकास परिवार या संस्थेच्या माध्यमातून १सप्टेंबर रोजी जनकल्याण कार्ड योजनेचा शुभारंभ हजारो महिलांच्या उपस्थितीत केला. या योजनेत ज्या महिलांकडे हे कार्ड असेल त्यांना यादी मध्ये समाविष्ठ करण्यात आलेल्या दुकानांमध्ये खरेदी केल्यास खरेदीवर १५ ते ५० पर्यंत सुट मिळणार आहे.




आ. केळकर यांनी या जनकल्याण कार्ड चे वाटप दुसऱ्या टप्प्यात काल ठाण्याच्या महाजन वाडी हॉल मध्ये केले. महिला विकास परिवाराचे पंढरीनाथ पवार, उमेश चोणकर यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. जवळ जवळ दोन हजार महिलांना काल जनकल्याण कार्ड चे वाटत करण्यात आले. या कार्यक्रमाला भाजपा चे ठाणे शहर अध्यक्ष संजय वाघुले, ठाणे जिल्हा हौसिंग फेडरेशनचे अध्यक्ष सीताराम राणे, ठाणे परिवहन सदस्य विकास पाटील, माजी उपमहापौर सुभाष काळे, व्यापारी आघाडीचे मितेश शाहा उपस्थित होते.



आ. केळकर यांनी माता भगिनींशी संवाद साधताना प्रथम सर्वांना कन्या दिनाच्या शुभेच्छा दिल्या. जनकल्याण कार्ड ची माहिती दिली. महिला सक्षमीकरण, महिला सबलीकरण हा आमचा महत्वाचा उद्देश आहे. आमच्या महिला विकास परिवार संस्थेच्या माध्यमातून अनेक महिला बचत गटांना आम्ही रोजगार देत असतो. मुलींना स्वरक्षणाचे धडे देत आहोत. महिलांच्या पाठीशी ठाम पणे उभे राहण्याचे काम महिला विकास परिवार करत आहे. दीड हजार च्या वर मुलीना संगणक प्रशिक्षण दिले आहे. पुढील काळात अनेक भागात कार्यक्रम घेऊन जनकल्याण कार्ड चे वाटप करणार असल्याचे आ. केळकर यांनी बोलताना सांगितले.

## गृहमंत्र्यांनी कुणाला वाचवण्यासाठी अक्षय शिंदेचा एन्काऊंटर केला?

**(पान १ वरून)** अक्षय शिंदे याला ट्रान्सिट रिमांडसाठी नेत असताना ही घटना घडली. अक्षय शिंदेंने पोलिसांची बंदूक हिसकावण्याचा प्रयत्न केला आणि त्या झटापटीत पोलिसांनी त्याला गोळ्या घातल्या. या प्रकरणावर पृथ्वीराज चव्हाण यांनी गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर आरोप केला. गृहमंत्र्यांनी कोणत्या संस्थाचालकाला वाचवण्यासाठी, इतर कोणत्या आरोपींना वाचवण्यासाठी त्याचा आवाज बंद केला असा सवाल त्यांनी विचारला.

**संस्थाचालकांना वाचवण्याचा प्रयत्न?** – पृथ्वीराज चव्हाण म्हणाले की, आज जी गोष्ट झाली त्यावरून राज्यातमध्ये काही कायदा सुव्यवस्था राहिली आहे की नाही असा प्रश्न पडतोय. अक्षय शिंदे यांचा एन्काऊंटर झाल्यानंतर या प्रकरणात कोण संस्थाचालक आणि आरोपी होते हे कधीही बाहेर येणार नाही.

बदलापूर प्रकरणी राज्यातील महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला होता. अशा परिस्थितीमध्ये या घटनेची सखोल चौकशी करण्याऐवजी आरोपीला मारून टाकले जाते. गृहमंत्र्यांचे काही वचक आहे की नाही? असा सवाल पृथ्वीराज चव्हाण यांनी विचारला.

**महाराष्ट्राची बदनामी सुरू** – गृहमंत्र्यांना ताबडतोब काढून टाकलं पाहिजे, कधी नव्हे ती महाराष्ट्राची बदनामी होत आहे असं पृथ्वीराज चव्हाण म्हणाले. ते म्हणाले की, या एन्काऊंटरमुळे पोलिस यंत्रणेवर प्रश्नचिन्ह उभारलं जात आहे. राज्यातली पोलिस यंत्रणा इतकी कूचकामी झाली आहे का? काय चाललंय का महाराष्ट्रात?

पृथ्वीराज चव्हाण म्हणाले की, बदलापूर प्रकरणात अक्षय शिंदेसोबत अजून कोण आरोपी होतं, या गोष्टीच्या तळापर्यंत जाणं गरजेचं होतं. सत्य बाहेर येऊन खऱ्या दोषीला शिक्षा व्हायला हवी होती. आता त्याचा एन्काऊंटर झाल्यामुळे हे कधीही समोर येणार नाही. आरोपीला मारण्यामध्ये कुणाचा इंटरेस्ट आहे हे तपासलं पाहिजे.

## सरपंच आणि उपसरपंचांच्या मानधनात दुप्पट वाढ

**(पान १ वरून)** निर्णयामुळे त्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयाची माहिती देताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितलं की, आम्ही सर्वसामान्यांच्या हितासाठी अनेक महत्वाचे निर्णय घेतले आहेत. राज्यातील सरपंच उपसरपंच यांच्या मानधनात दुप्पट वाढ करण्याच्या निर्णयासह लोहगाव विमानतळाचे नाव जगद्गुरु संत तुकाराम महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ पुणे असे करण्याचा निर्णय देखील घेण्यात आला आहे, अशी माहिती मुख्यमंत्री शिंदे यांनी दिली.

## ब्राह्मण समाजासाठी महामंडळ मंजूर

**(पान १ वरून)** करण्यात आली असून या महामंडळाच्या स्थापनेसाठी अनेक दिवसांपासून ब्राह्मण समाजाने आंदोलने केली होती. अखेर आजच्या मंत्रीमंडळ बैठकीत यावर निर्णय घेण्यात आला आहे.

राज्यात आरक्षणाच्या मागणीवरुन सर्वच समाज आक्रमक झाल्याचं दिसून येत आहे. त्याच पार्श्वभूमीवर ब्राह्मण समाजाकडूनही विद्यार्थ्यांना शासकीय लाभ मिळवून देण्यासाठी परशुराम आर्थिक विकास महामंडळाची मागणी करण्यात येत होती. त्यासाठी, अनेक ठिकाणी आंदोलनेही करण्यात आली आहेत. अखेर, विधानसभा निवडणुकांपूर्वीच्या आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत २४ महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. त्यामध्ये, परशुराम आर्थिक विकास महामंडळाला मंजुरी देण्यात आली आहे. तर, राजपूत समाजासाठी वीर शिरोमणी महाराणा प्रताप आर्थिक विकास महामंडळालही (नियोजन) कॅबिनेटने मंजुरी दिली आहे. त्यामुळे, राज्य सरकारने आजच्या निर्णयातून सर्वच समाजाला खुश करण्याचा प्रयत्न केलाय.

## नवी मुंबई महानगरपालिका

**मालमत्ता विभाग, नमुंमपा**

**फेरनिविदा सुचना (Expression of Interest) नमुंमपा/मालमत्ता/ 04 /2024-25**

**कामाचे नाव :-** Appointment of Real Estate Marketing and Adviser Consultant specialized in marketing, branding, sale & after sale services for commercial units developed by NMMC located in various nodes of Navi Mumbai Municipal Corporation, Maharashtra – India.

**नवी मुंबई महानगरपालिकेच्या जागा भाडेतत्वावर देण्याकरीता Real Estate Marketing and Adviser Consultant specialized in marketing, branding, sale & after sale services for commercial यांची नेमणूक करणेकरीता निविदा मागविण्यात येत आहेत.**

**इसारा रक्कम रु. :- 2,00,000/-**

**निविदा पुस्तिका ई-टेंडरिंग (E-tendring) संगणक प्रमाणाच्या** https://mahatendres.gov.in **या संकेत स्थळावर प्राप्त होतील. निविदेचे सादरीकरण खालील तक्तात नमूद केल्याप्रमाणे** https://mahatendres.gov.in **संकेत स्थळावर Online करण्याचे आहे.**

**निविदा सुचना प्रसिध्दीचा तपशील**

| | |
|---|---|
| **निविदा सुचना विक्री व भरणे (upload) कालावधी** | दिनांक 24/09/2024, दुपारी 03.00 वाजल्या पासुन ते दिनांक 08/10/2024 रोजी दुपारी 03.00 वाजेपर्यंत |
| **निविदा सुचना उघडण्याचा दिनांक** | दिनांक 09/10/2024 दुपारी 04.00 वाजता शक्य झाल्यास |

**निविदाकारांनी कोरी निविदा फॉर्म फी, इसारा अनामत रक्कम व सेवा शुल्क कोणत्याही बँकेचे नेट बँकिंग मार्फत भरणा करता येईल. उपरोक्त पैकी कोणतेही शुल्क नमुंमपाचे लेखा विभागात स्विकारले जाणार नाही, याची निविदाकांनी नोंद घ्यावी.**

सही/-
**उप आयुक्त (मालमत्ता)**
**नवी मुंबई महानगरपालिका**

जाक्र-नमुंमपा/जसं/जाहिरात/436/2024

## ठाणे महानगरपालिका, ठाणे

राजीव गांधी वैद्यकीय महाविद्यालय
छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय
**प्रथम मुदतवाढ निविदा सूचना**

ठाणे महानगरपालिकेच्या राजीव गांधी वैद्यकीय महाविद्यालय व छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयासाठी ठामपा/ पिआरओ/अधिष्ठाता/ ४१२/२०२४-२५ दि: ०२/०९/२०२४ अस्थिव्यंग चिकित्सा विभागासाठी OT TABLE उपकरण खरेदी करणेसाठी ऑन लाईन ई-टेडरिंग पद्धतीने निविदा मागविण्यात येत आहे. दरम्यानच्या कालावधीत सदर निविदेस प्रथम मुदतवाढ देण्यात येत आहे. निविदा सूचना व निविदा प्रपत्र ठाणे महानगरपालिकेचे संकेतस्थळावर https://mahatenders.gov.in दि.२४/०९/२०२४ ते दि.०८ / १० /२०२४ रोजी पर्यंत १६.०० वाजेपर्यंत उपलब्ध होतील. दि. ०८/ १०/२०२४ रोजी १६.३० वाजेपर्यंत ऑनलाइन निविदा स्वीकारण्यात येतील. दि.१४/१०/२०२४ रोजी १६.०० वाजता स्वीकारलेल्या निविदा ऑनलाइन उघडण्यात येतील.

ठामपा /पिआरओ/अधिष्ठाता/५५०/२०२४-२५ सही/-
दि.२३.०९.२०२४ अधिष्ठाता
**plsvisitourofficialweb-site** छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय व
**www.thanecity.gov.in** राजीव गांधी वैद्यकिय महाविद्यालय

Public Trusts Registration Office, Thane
Address: 1st Floor,Lilly Apt, Parsi Agari Lane
Tembi Naka Thane (w)- 400601

**Public Notice**

Service Request Number : THN/13608/18/24
Inquiry/case No. : ACC/I/992/2024
Name of the Trust : शिवस्वराज्य चॅरिटेबल ट्रस्ट
**Address of the Trust : रूम नं. ०२, नरे निवास, ओमकार निवासच्या जवळ, डोंगरीपाडा, ठाणे (डब्ल्यु)ठाणे, ठाणे, ठाणे**
**Name of the Applicant : श्री. सुनिल लीलाधर नरे**

To
**All Concerned having interest**
Whereas in the above application under section 19 of the Maharashtra Public Trust Act 1950, an enquiry is to be made under section 19 of the said Act, on the following points by the Asst. Charity Commissioner, Thane.

1. Whether a Trust in the respect of the above exists and whether such Trust is a public Trust?
2. Whether any of the following properties are the properties of such Trust?

**Movable Property**

| SR | Property Details | Estimated Value |
|---|---|---|
| 1 | Cash In Hand | 1000.00 |

**Value of Movable Property :** Rs. 1000/- Only
(In Words Rs. One Thousand Only)

**Immovable Property**

| SR NO | Town Or Village | CS Or Municipal Or Survey No | Area | Assessment Or Judiciary | Tenure Or Nature | Estimated Value |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Nil | Nil | Nil | Nil | Nil | 0.00 |

Value of Immovable Property : Rs. 0/- Only
(In Words Rs. Only)

This is to call upon you to submit your objections or any evidences if any, at the above office address within 30 days from the date of publication of this notice in written. If not received anything within given period, the inquiry would be completed & necessary orders will be passed. If no objections are received within the stipulated time then further inquiry would be completed and necessary orders will be passed.

This notice given under my hand and seal of the Office on this date 16/09/2024.

Stamp

Sign/-
Superintendent
Public Trusts registration Office,
Thane

## ठाणे महानगरपालिका, ठाणे

कार्मिक विभाग
जाहिर नोटीस

ठाणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील पाच वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी विनापरवाना गैरहजर कर्मचारी खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचे नाव | पदनाम | विभागाचे नाव | गैरहजर दिनांक. |
|---|---|---|---|---|
| ०१. | श्री. बाबु कथलप्पा कर्मचारी सांकेतांक – ११९१७ | सफाई कामगार | वागळे प्रभाग समिती | दि.१७/०२/२०१६ आजतागायत |
| ०२. | श्री. अशोक नाना कारखिले कर्मचारी सांकेतांक – १२९६५ | सफाई कामगार | वागळे प्रभाग समिती | दि.०१/०९/२०१५ आजतागायत |
| ०३. | श्री. सुशिल दिलीप सकपाळ कर्मचारी सांकेतांक – १३०५३ | शिपाई | वर्तकनगर प्रभाग समिती | दि.०१/०८/२०१७ आजतागायत |
| ०४. | श्री. पंढरीनाथ यशवंत घोडविंदे कर्मचारी सांकेतांक – १०८१२ | सफाई कामगार | वर्तकनगर प्रभाग समिती | दि.३१/१०/२०१७ आजतागायत |

उपरोक्त चारही कर्मचारी यांचा गैरहजर कालावधी हा पाच वर्षापेक्षा जास्त असून त्यांनी त्यांच्या गैरहजेरी काळात कार्यालयाशी कोणत्याही प्रकारे संपर्क साधलेला नाही. त्यावरून त्यांना महापालिकेच्या नोकरीची आवश्यकता नसल्याचे दिसून येते. तसेच त्यांचा गैरहजर कालावधी विचारात घेता महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ चे नियम १३ (दोन) च्या तरतूदी अन्वये त्यांचेविरुध्द विभागीय चौकशी न करता त्यांना सेवेतून कमी का करण्यात येऊ नये याबाबत सादर जाहीर नोटीशीव्दारे कळविण्यात येते की, त्यांना सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या कार्यालयाकडे खुलासा सादर करावा. विहित मुदतीत खुलासा प्राप्त न झाल्यास, उपरोक्त चारही कर्मचाऱ्यांना काहीही सांगावयाचे नाही व ठाणे महानगरपालिकेच्या सेवेत स्वारस्य नाही असे गृहीत धरुन, त्यांना ठाणे महानगपालिकेच्या सेवेतून कमी करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

मा. आयुक्त सो. यांचे मान्यतेने
ठामपा/पिआरओ/का.वि/५६६/२०२४-२५ सही/-
दि:२३.०९.२०२४ उपआयुक्त
Pls visit our official web-site उपआयुक्त (मुख्यालय)
www.thanecity.gov.in ठाणे महानगरपालिका,ठाणे

## भारतीय रेल्वे

### महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान

■ पदाचे नाव :
१ राज्य संसाधन व्यक्ती (SRPs)
■ शैक्षणिक पात्रता: (i) पदवीधर/MSW/MBA (ii) मराठी आणि MSऑफिसचे ज्ञान आवश्यक. (iii) ०७ वर्षे अनुभव
■ वयाची अट: ०१ जून २०२४ रोजी ६० वर्षांपर्यंत.
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण महाराष्ट्र
■ फी : फी नाही.
■ Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: ३० सप्टेंबर २०२४
■ अधिकृत वेबसाईट https://www.umed.in/

सभासद व्हा ....आणि दररोज नोकऱ्यांची माहिती आपल्या मोबाईलवर थेट मिळवा
वार्षिक वर्गणी फक्त 450/-
संपर्क : 9892305888

■ पदाचे नाव :
१ डायटीशियन
२ नर्सिंग सुपरिटेंडेंट
३ ऑडिओलॉजिस्ट स्पीच थेरेपिस्ट
४ क्लिनिकल सायकोलॉजिस्ट
५ डेंटल हाइजीनिस्ट
६ डायलिसिस टेक्निशियन
७ हेल्थ मलेरिया इंस्पेक्टर ग्रेड III
८ लॅब सुपरिटेंडेंट ग्रेड III
९ पर्फ्युजनिस्ट
१० फिजियोथेरेपिस्ट ग्रेड II
११ ऑक्यूपेशनल थेरेपिस्ट
१२ कॅथ लॅब टेक्निशियन
१३ फार्मासिस्ट
१४ रेडिओग्राफर एक्स-रे टेक्निशियन
१५ स्पीच थेरपिस्ट
१६ कार्डियाक टेक्निशियन
१७ ऑप्टोमेट्रिस्ट
१८ ECG टेक्निशियन
१९ लॅब असिस्टंट ग्रेड II
२० फील्ड वर्कर
■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.१: B.Sc + डायटीशियन PG डिप्लोमा किंवा B.Sc (Home Science) + M.Sc Home Science (Food and Nutrition)
पद क्र.२: GNM² किंवा B.Sc (Nursing)
पद क्र.३: B-SLP
पद क्र.४: पदव्युत्तर पदवी (Clinical Psychology / Social Psychology)
पद क्र.५: (i) B.Sc (Biology) (ii) डेंटल हाइजीन डिप्लोमा (iii) ०३ वर्षे अनुभव
पद क्र.६: B.Sc.+डिप्लोमा (Haemodialysis) किंवा ०२ वर्षे अनुभव
पद क्र.७: (i) B.Sc.(Chemistry) (ii) हेल्थ / सॅनिटरी इंस्पेक्टर डिप्लोमा किंवा NTC (Health Sanitary Inspector)
पद क्र.८: B.Sc (Bio-Chemistry / Micro Biology / Life science)+DMLT किंवा B.Sc (Medical Technology)
पद क्र.९: B.Sc + डिप्लोमा (Perfusion Technology) किंवा B.Sc + ०३ वर्षे अनुभव
पद क्र.१०: (i) फिजिओथेरेपी पदवी (ii) ०२ वर्षे अनुभव
पद क्र.११: (i) १२वी उत्तीर्ण (ii) ऑक्यूपेशनल थेरेपी डिप्लोमा/पदवी
पद क्र.१२: B.Sc+ डिप्लोमा (Cardiac Professional Cath Lab work) किंवा ०२ वर्षे अनुभव
पद क्र.१३: १२वी उत्तीर्ण+D.Pharm किंवा B.Pharma
पद क्र.१४: १२वी उत्तीर्ण (PhysicsChemistry) (ii) डिप्लोमा (Radiography/ X Ray Technician/ Radiodiagnosis Technology)
पद क्र.१५: (i) B.Sc (ii) डिप्लोमा (Audio and Speech Therapy) (iii) २ वर्षे अनुभव
पद क्र.१६: १२वी (Science) उत्तीर्ण किंवा डिप्लोमा (Cardiology Lab)
पद क्र.१७: B.Sc (Optometry) किंवा (Ophthalmic Technician)
पद क्र.१८: (i) १२वी उत्तीर्ण /B.Sc (ii) डिप्लोमा/पदवी (ECG Laboratory Technology / Cardiology /Cardiology Technician / Cardiology Techniques )
पद क्र.१९: (i) १२वी उत्तीर्ण (ii) DMLT
पद क्र.२०: १२वी उत्तीर्ण (Biology/ Chemistry)
■ वयाची अट: ०१ जानेवारी २०२५ रोजी, SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
पद क्र.१,४,५,७,८,१०, ११, १२, १५ ते १९: १८ ते ३६ वर्षे
पद क्र.२: २० ते ४३ वर्षे
पद क्र.३: २१ ते ३३ वर्षे
पद क्र.६: २० ते ३६ वर्षे
पद क्र.९: २१ ते ४३ वर्षे
पद क्र.१३: २० ते ३८ वर्षे
पद क्र.१४: १९ ते ३६ वर्षे
पद क्र.२०: १८ ते ३३ वर्षे
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ Fee: General/OBC/EWS: ५००/- SC/ST/ExSM²/ /EBC/महिला: २५०/-
■ Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: १६ सप्टेंबर २०२४
■ परीक्षा: नंतर कळविण्यात येईल.
■ अधिकृत संकेतस्थळ https://indianrailways.gov.in/

### एसएससीमार्फत जीडी कॉन्स्टेबल पद

■ पदाचे नाव:
१ GD कॉन्स्टेबल (जनरल ड्युटी)
■ अ. क्र.
१ Border Security Force (BSF)
२ Central Industrial Security Force (CISF)
३ Central Reserve Police Force (CRPF)
४ Sashastra Seema Bal (SSB)
५ Indo-Tibetan Border Police (ITBP)
६ Assam Rifles (AR)
७ Secretariat Security Force (SSF)
८ Narcotics Control Bureau (NCB)
Total ३९४८१
■ शैक्षणिक पात्रता: १०वी उत्तीर्ण.
■ शारीरिक पात्रता:
पुरुष/महिला प्रवर्ग उंची (सेमी) छाती (सेमी)
पुरुष, SC OBC १७० ८०/ ५
ST १६२.५ ७६/ ५
महिला Gen, SC OBC १५७ N/-
ST १५० N/-
वयाची अट: ०१ जानेवारी २०२५ रोजी १८ ते २३ वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
■ नोकरी ठिकाण : संपूर्ण भारत
Fee: General/OBC: १००/- SC/ST/ExSM²/महिला : फी नाही
महत्वाच्या तारखा :
Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: १० ऑक्टोबर २०२४
■ परीक्षा : जानेवारी/फेब्रुवारी २०२५
■ संकेतस्थळ https://ssc.gov.in/

### भारतीय अंतर्देशीय जलमार्ग प्राधिकर

■ पद क्र. असिस्टंट डायरेक्टर, असिस्टंट हायड्रोग्राफिक सर्व्हेअर, परवाना इंजिन ड्रायव्हर, ज्युनियर अकाउंट्स ऑफिसर, ड्रेज कंट्रोल ऑपरेटर, स्टोअर कीपर, मास्टर 2nd क्लास, स्टाफ कार ड्रायव्हर, मास्टर ३ीव क्लास, मल्टी टास्किंग स्टाफ टेक्निकल असिस्टंट (
■ शैक्षणिक पात्रता: पद क्र.१: इंजिनिअरिंग पदवी (Civil / Mechanical)
पद क्र.२: (i) सिव्हिल इंजिनिअरिंग पदवी (ii) ०३ वर्षे अनुभव
पद क्र.३: (i) १०वी उत्तीर्ण (ii) इंजिन ड्रायव्हर परवाना
पद क्र.४: B.Com + ०३ वर्षे अनुभव किंवा B.Com+Inter ICW-/Inter C-.
पद क्र.५: (i) १०वी उत्तीर्ण +१० वर्षांसह अनुभवसह प्रथम श्रेणी चालक म्हणून योग्यतेचे प्रमाणपत्र किंवा मेकॅनिकल इंजिनिअरिंग डिप्लोमा +०१ वर्षे अनुभव (ii) पोहण्याचे ज्ञान.
पद क्र.६: (i) १०वी उत्तीर्ण (ii) ०५ वर्षे अनुभव
पद क्र.७: (i) मास्टर २पव क्लास प्रमाणपत्र (ii) पोहण्याचे ज्ञान.
पद क्र.८: (i) १०वी उत्तीर्ण (ii) वाहन चालक परवाना (iii) ०२ वर्षे अनुभव
पद क्र.९: (i) मास्टर ३ीव क्लास प्रमाणपत्र (ii) पोहण्याचे ज्ञान.
पद क्र.१०: १०वी उत्तीर्ण
पद क्र.११: पदवी (Civil / Mechanical/ Marine Engineering /Naval Architecture) किंवा इंजिनिअरिंग डिप्लोमा (Civil / Mechanical / Marine Engineering / Naval Architecture)+ ०३ वर्षे अनुभव
■ वयाची अट: १५ सप्टेंबर २०२४ रोजी, SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
पद क्र.१, २, ७: ३५ वर्षांपर्यंत
पद क्र.३, ४, ५, ८, ९ ११: ३० वर्षांपर्यंत
पद क्र.६: २५ वर्षांपर्यंत
पद क्र.१०: १८ ते २५ वर्षे
■ Fee: General/OBC: 500/- SC/ST/EWS/PWD:200/-
अर्ज करण्याची शेवटची तारीख: २१ सप्टेंबर २०२४

### महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान

■ पदाचे नाव :
१ राज्य संसाधन व्यक्ती (SRPs)
■ शैक्षणिक पात्रता: (i) पदवीधर/MSW/MBA (ii) मराठी आणि MSऑफिसचे ज्ञान आवश्यक. (iii) ०७ वर्षे अनुभव
■ वयाची अट: ०१ जून २०२४ रोजी ६० वर्षांपर्यंत.
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण महाराष्ट्र
■ फी : फी नाही.
■ Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: ३० सप्टेंबर २०२४
■ अधिकृत वेबसाईट https://www.umed.in/

## कोकण रेल्वे

■ पदाचे नाव
सिनियर सेक्शन इंजिनिअर (Civil) ०५
२ सिनियर सेक्शन इंजिनिअर (Electrical) ०५
३ स्टेशन मास्टर १०
४ कमर्शियल सुपरवाइजर ०५
५ गुड्स ट्रेन मॅनेजर ०५
६ टेक्निशियन III (Mechanical) २०
७ टेक्निशियन III (Electrical) १५
८ ESTM-III (ST) १५
९ असिस्टंट लोको पायलट १५
१० पॉइंट्स मन ६०
११ ट्रॅक मेंटेनर-IV ३५
■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.१: इंजिनिअरिंग पदवी (Civil)
पद क्र.२: इंजिनिअरिंग पदवी (Mechanical/ Electrical / Electronics)
पद क्र.३: कोणत्याही शाखेतील पदवी
पद क्र.४: कोणत्याही शाखेतील पदवी
पद क्र.५: कोणत्याही शाखेतील पदवी
पद क्र.६: (i) १०वी उत्तीर्ण (ii) ITI (Fitter / Mechanic Diesel / Mechanic (Repair and Maintenance of Heavy Vehicles) /Mechanic Automobile (Advanced Diesel Engine) / Mechanic (Motor Vehicle)/ Tractor Mechanic /Welder / Painter)
पद क्र.७: (i) १०वी उत्तीर्ण (ii) ITI (Electrician/ Wireman/Mechanic )
पद क्र.८: (i) १०वी उत्तीर्ण (ii) ITI (Electrician / Electronics Mechanic / Wireman) किंवा १२वी उत्तीर्ण (Physics Maths)
पद क्र.९: (i) १०वी उत्तीर्ण (ii) ITI (Armature and Coil Winder / Electrician / Electronics Mechanic / Fitter /Heat Engine / Instrument Mechanic / Machinist / Mechanic Diesel / Mechanic (Motor Vehicle) / Millwright Maintenance Mechanic / Mechanic Radio TV / Refrigeration and Air-conditioning Mechanic / Tractor Mechanic / Turner / Wireman) किंवा इंजिनिअरिंग डिप्लोमा (Mechanical / Electrical / Electronics / -utomobile)
पद क्र.१०: १०वी उत्तीर्ण
पद क्र.११: १०वी उत्तीर्ण
■ वयाची अट: ०१ ऑगस्ट २०२४ रोजी १८ ते ३६ वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
■ नोकरी ठिकाण: कोकण रेल्वे
■ फी : ५९/-
■ Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: ०६ ऑक्टोबर २०२४
अधिकृत संकेतस्थळ
■ https://konkanrailway.com/

# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका आरोग्य व स्वच्छता विभागाकडून स्वभाव स्वच्छता संस्कार स्वच्छता अभियान

**भिवंडी – केंद्रीय गृहनिर्माण व शहरी कार्य मंत्रालय, भारत सरकार व महाराष्ट्र शासन यांच्या निर्देशानुसार दि.१७/०९/२०२४ ते दि.०२/१०/२०२४ दरम्यान स्वच्छता हि रोवा (डक्ह) पंधरवडा स्वभाव स्वच्छता संस्कार स्वच्छता अभियान भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात सुरु असून त्या अंतर्गत दि. २३/०९/२०२४ रोजी स्व. राजय्या गाजेंगी सभागृह ते छत्रपती शिवाजी महाराज चोक मार्गावर 'विशेष स्वच्छता जनजागृती रॅली व श्रमदान' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.**




भिवंडी निजामपूर मनपा प्रशासक तथा आयुक्त अजय वैद्य यांच्या अध्यक्षतेखाली व भिवंडी विधानसभा (पश्चिम) आमदार महेश चौघुले यांच्या प्रमुख उपस्थितीत स्व. राजय्या गाजेंगी सभागृह येथे दीपप्रज्वलन व राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. भिवंडी मनपा उपआयुक्त (मुख्या.) श्रीमती नयना ससाणे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक सादर केले असून त्या अंतर्गत सदर कार्यक्रमाचे स्वरूप, व्याप्ती व कार्यक्रमास सहकार्य करण्याचे आवाहन केले. तद्नंतर प्रमुख पाहुणे श्री. महेश चौघुले आमदार विधानसभा पश्चिम यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना स्वच्छतेचे महत्व, स्वच्छतेची सुरुवात दररोज आपल्या घरापासून करण्याचे आवाहन केले. मनपा आयुक्त अजय वैद्य यांनी सदर प्रसंगी सार्वजनिक स्वच्छतेचे महत्व, स्वच्छ भारत अभियानातील मनपाची कामगिरी व शहराच्या स्वच्छतेत नागरिकांची भूमिका या बाबत उपस्थित मनपा अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व उपस्थिताना स्वच्छतेची शपथ देण्यात आली.

लेझीम व ढोल पथकाच्या सांस्कृतिक वातावरणात पार पडलेल्या 'विशेष स्वच्छता जनजागृती रॅली व श्रमदान कार्यक्रमात मनपाचे सर्व अधिकारी तसेच कर्मचारी, मनपाच्या ११ माध्यमिक विद्यालये, खाजगी शाळा चाचा नेहरू, एन.ई.एस. प. रा. विद्यालय, बी.एन.एन. महाविद्यालय NSS व NCC तसेच पद्मश्री श्री. अण्णासाहेब जाधव विद्यालयाचे लेझीम पथक असे एकूण १००० विद्यार्थी तसेच मनपा कार्यक्षेत्रातील रोटरी क्लब ऑफ भिवंडी (सेन्ट्रल), प्रजापिता ब्रह्मकुमारी कोंबडपाडा सेंटर, उदंड ढोल पथक युवा वर्ग असे विविध भागधारक उपस्थित होते.



एक पेड माँ के नाम या विशेष उपक्रम अंतर्गत मनपा आयुक्त तथा प्रशासक श्री. अजय वैद्य, अतिरिक्त आयुक्त श्री.विठ्ठल डाके, उपआयुक्त (मुख्यालय) श्रीमती नयना ससाणे, उपआयुक्त (समाज कल्याण विभाग) श्रीमती. प्रणाली घोंगे, उपआयुक्त (शिक्षण) श्री. बाळाराम जाधव सहाय्यक आयुक्त (प्रशासन) श्री. अजित महाडिक, सहाय्यक आयुक्त (आरोग्य) श्री. फैसल तातली, सार्वजनिक आरोग्य अधिकारी श्री. जयवंत सोनवणे, जनसंपर्क अधिकारी श्री. श्रीकांत परदेशी, उद्यान अधीक्षक श्री. निलेश संखे तसेच इतर सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्याउपस्थित नाना नानी पार्क येथे मनपा आयुक्त, अतिरिक्त आयुक्त, उपआयुक्त (मुख्यालय) व इतर सर्व अधिकारी यांच्या आईच्या नावे वृक्षारोपण करण्यात आले.

नाना नानी पार्क ते छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गावर मनपा आयुक्त तथा प्रशासक श्री. अजय वैद्य, अतिरिक्त आयुक्त श्री.विठ्ठल डाके, उपआयुक्त (मुख्यालय) श्रीमती नयना ससाणे, उपआयुक्त (समाज कल्याण विभाग) श्रीमती. प्रणाली घोंगे व इतर सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे मार्फत श्रमदान करण्यात आले. मनपा आयुक्त श्री. अजय वैद्य, अतिरिक्त आयुक्त श्री. विठ्ठल डाके, उपआयुक्त (मुख्यालय) श्रीमती नयना ससाणे यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना केलेले मागदर्शन व विद्यार्थ्यांचा उत्साह उल्लेखनीय होता. सर्व मनपा अधिकारी, कर्मचारी, शाळांचे शिक्षक विद्यार्थी यांच्या उपस्थित मान्यवरांचे व सर्व भागधारकांचे आभार व्यक्त करत स्वच्छता जनजागृती रॅलीचा समारोप छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे झाला. आरोग्य विभाग, शिक्षण विभाग व जनसंपर्क विभाग यांच्या समन्वयातून 'विशेष स्वच्छता जनजागृती रॅली व श्रमदान' कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले होते.




# पर्यावरणपूरक गणोशोत्सवाला पनवेलकरांचा सकारात्मक प्रतिसाद

पनवेल – पनवेल महापालिका क्षेत्रात नागरिकांनी पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करावा असे आवाहन पनवेल महानगरपालिकेने केले होते, या आवाहनाला पनवेकरांचा सकारात्मक प्रतिसाद दिसून आला. माझी वसुंधरा अंतर्गत स्वच्छ, सुंदर आणि प्रदूषणमुक्त पनवेलसाठी पनवेल महानगरपालिका विविध उपक्रम राबवित आहे. या अंतर्गतच सणांचं पावित्र्य आणि पर्यावरणाचं भान राखलं जावं यासाठी आयुक्त श्री. मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी 'बाप्पा माझा पर्यावरणाचा राजा' ही मोहीम हाती घेतली होती. यासाठी महापालिकेने विशेष अशी सप्तसूत्री देखील बनविली होती. या सप्तसूत्रीचे पालन करण्याचे आवाहन आयुक्तांनी केले होते. यासाठी महापालिकेने विशेष जय्यत तयारी केली होती. याकामी विविध एनजीओ, सेवाभावी संस्थांचे महापालिकेला सहकार्य मिळाले.

लहानांपासून ते मोठ्यांपर्यंत गणशोत्सव हा सर्वांचा आवडता सण आहे. महापालिका क्षेत्रात गणेशोत्सव मोठ्या प्रमाणात साजरा होत असतो. उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिका क्षेत्रातील कळंबोली, कोमोठे, पनवेल, खारघर या चारही प्रभागात घरगुती व २५० हून अधिक सार्वजनिक गणेश मंडळांच्या गणपतींचे भाक्तिमय वातावरणात नियोजनबध्दरित्या शांततेत दीड दिवसाचे, पाच दिवसाचे , सहा दिवसाचे, सात दिवसाचे, दहा दिवसाचे गणपतीचे विसर्जन करण्यात आले. यावर्षी शाडू मातीच्या मुर्तीना नागरिकांचा मोठा प्रतिसाद दिसून आला. याबरोबरच कृत्रिम तलावालाही नागरिकांनी मोठी पसंती दिली. यावर्षी शाडू मातीच्या गणेश मुर्तीचे पनवेलमध्ये दीड दिवसाचे ,पाच दिवसाचे , सहा दिवसाचे व दहा दिवसाचे असे एकूण नैसर्गिक तलावामध्ये ४ हजार ४७१ , तर कृत्रिम तलावामध्ये २ हजार ३८९ गणेशमुर्तीचे विसर्जन करण्यात आले. कृत्रिम तलावामध्ये विसर्जन करणाऱ्या नागरिकांना विशेष प्रशस्तीपत्रक देऊन सन्मानित करण्यात आले.

### शाडू मातीच्या मुर्तींना व कृत्रिम तलावाला नागरिकांनी दिली पसंती

■ निर्माल्य रथ यावर्षी महापालिकेच्यावतीने निर्माल्य रथाची अभिनव संकल्पना महापालिकेन राबविली. यामध्ये दहा दिवस सार्वजनिक गणेश मंडळे व विसर्जन ठिकाणचे एकुण २० टन निर्माल्य गोळा झाले. यामध्ये ६ टन निर्माल्यापासून धूपकांडी व अगरबत्ती बनविण्यात येणार आहे. तसेच ४.५ टन निर्माल्यापासून नानासाहेब प्रतिष्ठान यांच्यावतीने सेंद्रिय खत बनविण्यासाठी येणार आहे.याबरोबरच पालिकेच्यावतीने ९.५ टन निर्माल्याचे सेंद्रिय खत बनविण्यात येणार आहे.

■ 'बाप्पा माझा पर्यावरणाचा राजा' ही मोहिमेंतर्गत पर्यावरणपूरक गणेशोत्सव राबविण्यास महापालिकेस चारही प्रभागामध्ये यावर्षी विविध एनजीओ, सामाजिक संस्थानी देखील बहुमोल सहकार्य झाले. यामध्ये पर्यावरण दक्षता मंच, रोटरी क्लब, लायन्स क्लब, भारत विकास परिषद, निसर्ग मित्र संस्था, सिटीझन्स युनिटी फोरम, रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ, आर्या फूडस्, अल्ट्रास्टिक फाऊंडेशन, रोडपाली रेसिडन्स् वेलफेअर असोशिएशन, मराठी ब्राम्हण समाज, नॅचरल हेल्थ ड्रग फाऊंडेशन, रॉबिन हूड आर्मी वेलफेअर, संघर्ष समिती महिला संस्था, खारघर तळोजा कॉलनी वेलफेर,पोलिस विभाग याबरोबर व्यक्तीगत पातळीवर देखील नागरिकांनी सहकार्य केले. याबरोबर माजी नगरसेवकांनी देखील पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी सहकार्य केले.



# स्वच्छता ही सेवा अभियानातंर्गत सफाई कर्मचाऱ्यांकरीता आरोग्य तपासणी शिबीर संपन्न

कल्याण – शासनाच्या निर्देशानुसार स्वच्छता ही सेवा हा कार्यक्रम घोषित करण्यात आलेला आहे. त्यानुसार दि. १८ सप्टेंबर २०२४ ते दि. ०२ ऑक्टोबर २०२४ या कालावधीमध्ये स्वच्छता हि सेवा या अभियाना तंर्गत अनेक कार्याक्रमांचे आयोजन महापालिकेमार्फत करण्यात येत आहे. सन २०२४ करीता स्वभाव स्वच्छता – संस्कार स्वच्छता हा स्वच्छता ही सेवे चा मुख्य विषय निर्धारीत करण्यात आला आहे.

त्या अनुषंगाने शनिवार दि. २१ सप्टेंबर २०२४ व रविवार दि. २२ सप्टेंबर २०२४ रोजी बाई रुक्मीणीबाई रुग्णालय व शास्त्रीनगर सामान्य रुग्णालय येथे महापालिकेच्या सफाई कर्मचाऱ्यांकरीता आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.


सदर शिबीराचे प्रथम सत्र शनिवार दि. २१ सप्टेंबर २०२४ रोजी संपन्न झाले असून शिबीरातंर्गत बाई रुक्मीणीबाई रुग्णालय येथे २४३ तर शास्त्रीनगर सामान्य रुग्णालय येथे १७२ सफाई कर्मचारी अशा एकूण ४१५ सफाई कर्मचारी यांची आरोग्य तपासणी करण्यात आली. तर शिबीराचे व्दितीय सत्रात रविवार दि. २२ सप्टेंबर २०२४ रोजी बाई रुक्मीणीबाई रुग्णालय येथे ८९ सफाई कर्मचारी व शास्त्रीनगर सामान्य रुग्णालय येथे ४७ सफाई कर्मचारी अश्या एकूण १३६ सफाई कर्मचारी यांची आरोग्य तपासणी करण्यात आली. दोन्ही रुग्णालयांमार्फत दि. २१ सप्टेंबर व दि. २२ सप्टेंबर रोजी स्वतंत्र डॉक्टर्स व पॅरामेडीकल कर्मचारी यांची नियुक्ती करुन आरोग्य तपासणी शिबीर यशस्वीपणे पार पाडले.

दैनिक महाराष्ट्र सम्राट
सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच !



## ध्यानमंदिर, अद्यावत ग्रंथालय, ज्येष्ठ नागरिकांसाठी अद्ययावत वास्तू

# ठाणेकरांसाठी सुविधा उपलब्ध होणार





## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते लवकरच होणार लोकार्पण

**खासदार नरेश म्हस्के, महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी अंतिम टप्प्यात असलेल्या या कामांची केली पाहणी**

ठाणे – ठाणेकरांना ध्यानधारणा आणि योग करण्यासाठी रहेजा संकुलासमोरच्या सुविधा भूखंडावर ध्यानमंदिर, कशिश पार्क येथे अद्ययावत ग्रंथालय, आणि हाजुरी येथे ज्येष्ठ नागरिकांसाठी बहुउद्देशीय अद्ययावत वास्तू अशा तीन सुविधांच्या अंतिम टप्प्यात असलेल्या कामांची पाहणी सोमवारी खासदार नरेश म्हस्के आणि महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी केली. या पाहणीच्यावेळी माजी नगरसेवक विकास रेपाळे, नम्रता भोसले हेही उपस्थित होते.

या तिन्ही बांधकामामुळे ठाणेकरांना चांगली सुविधा उपलब्ध होणार आहे. या सुविधांचे योग्य नियोजन आणि व्यवस्थापन करण्यात यावे. या वास्तूंची देखभाल व दुरुस्ती व्यवस्थित केली जावी, असे प्रतिपादन यावेळी खासदार नरेश म्हस्के यांनी केले. तर, या सुविधांमुळे ठाणेकरांना पर्वणी मिळणार आहे. अत्याधुनिक पद्धतीचे ग्रंथालय, ध्यानधारणा मंदिर आणि उद्यान तसेच ज्येष्ठ नागरिकांसाठी व्यायाम, वाचन, खेळ आदी सुविधांसह अद्ययावत वास्तू अशा प्रकारच्या तीन सुविधांची कामे अंतिम टप्प्यात आली आहेत. या सुविधा लवकरच, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शुभहस्ते, ठाणेकरांच्या सेवेत दाखल होणार असल्याचे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी सांगितले.

या पाहणी दौऱ्यात, अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, नगर अभियंता प्रशांत सोनाग्रा, उपायुक्त शंकर पाटोळे आणि मनोहर बोडके, उप नगर अभियंता शुभांगी केसवानी आणि सुधीर गायकवाड, सहाय्यक आयुक्त सोपान भाईक, कार्यकारी अभियंता ऋषिकेश जवळकर, वृक्ष अधिकारी केदार पाटील आदी उपस्थित होते.

### ध्यान मंदिर व उद्यान

रहेजा संकुलासमोरील सुविधा भूखंडावर ध्यानमंदिर व हँगिंग गार्डन तयार करण्यात आले आहे. नागरिकांना येथे ध्यानधारणेसाठी सुविधा तसेच योगासनांसाठी सुविधा उपलब्ध होण्याबरोबरच पहिल्या मजल्यावर एका उद्यानाची निर्मिती करण्यात आली आहे.

### धर्मवीर आनंद दिघे अद्ययावत ग्रंथालय

कशिश पार्क येथील महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीत आठव्या मजल्यावर धर्मवीर आनंद दिघे अद्ययावत ग्रंथालय तयार करण्यात आले आहे. या ग्रंथालयात सुमारे वीस हजार पुस्तके उपलब्ध करून देण्यात आली आहेत. त्याचबरोबर, संदर्भ ग्रंथ, वाय-फाय सुविधा, वाचनालय, चर्चासत्रासाठी छोटेखानी ॲम्फी थिएटर, छोटेसे उपहारगृह आदी व्यवस्था करण्यात आल्या आहेत.

### मातोश्री गंगूबाई संभाजी शिंदे ज्येष्ठ नागरिक नंदनवन

हाजुरी येथे मातोश्री गंगूबाई संभाजी शिंदे ज्येष्ठ नागरिक नंदनवन या अद्ययावत वास्तूची उभारणी करण्यात आली आहे. ज्येष्ठ नागरिकांसाठी नंदनवन या संकल्पनेवर आधारित वास्तूची निर्मिती करण्यात आली असून या चार मजली वास्तूमध्ये बहुउद्देशीय सभागृह, व्यायाम शाळा, योग सेंटर, कॅरम, बुद्धिबळ आदी खेळाच्या सुविधा आणि ग्रंथालय व वाचनालय या सुविधा तयार करण्यात आल्या आहेत.

## डोंबिवली जवळील पिसवलीत राहुलभाई पाटीलच्या गुंडांची दहशत

डोंबिवली – डोंबिवलीतील पिसवली, आडिवली-ढोकळी, कल्याण पूर्व भागात राहुल पाटील या भाईच्या गुंडांची दहशत वाढल्याने स्थानिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. शनिवारी मध्यरात्री राहुल भाईच्या आकाश भोईर आणि त्याच्या समर्थक गुंडांनी दोन पादचाऱ्यांना बेदम मारहाण केली. घटनास्थळी दाखल पोलिसांनी गुंडांना शांत राहण्याचा सल्ला दिल्यावर गुंडांनी त्यांनाही धक्काबुक्की, शिवीगाळ करत गुंड पोलिसांदेखत पळून गेले.

या गुंडांना पोलिसांचा धाक राहिला नसल्याने त्यांची मुजोरी वाढली असल्याचे स्थानिक रहिवाशांनी सांगितले. पिसवली परिसरात राहणारे सचिन टाक, त्याचा मित्र मयूर खान शनिवारी मध्यरात्री उशिरा कामावरून घरी परतत होते. ते पिसवली भागातून पायी घरी चालले होते. त्यावेळी रस्त्याच्या कडेला राहुलभाई पाटीलचा समर्थक गुंड आकाश भोईर सिगारेट ओढत होता. आकाशने सिगारेटचा झुरका घेऊन धूर रस्त्याने पायी चाललेल्या पादचारी सचिन टाक यांच्या तोंडावर सोडला. काही कारण नसताना माझ्या तोंडावर सिगारेटचा धूर का सोडला, असा प्रश्न सचिनने आरोपी आकाश भोईरला केला. आकाशने काहीही न बोलता सचिनला बेदम मारहाण सुरू केली. उलट आकाशने त्याचे दोन समर्थक घटनास्थळी बोलावून घेतले. तिघांनी मिळून सचिनला जमिनीवर पाडून लाथाबुक्क्यांनी मारले. आम्ही राहुलभाई पाटील याची माणसे आहोत. आमच्या नादाला लागायचे नाही. येथे आवाजही करायचा नाही, अशी धमकी गुंड आकाशने सचिनला दिली.

सचिनने तात्काळ मानपाडा पोलिसांना मध्यरात्री संपर्क केला. हवालदार लखन म्हात्रे, पी. के. रामण्णा घटनास्थळी आले. सचिन टाकने आकाश भोईर आणि त्याच्या समर्थकांनी आपणास काही कारण नसताना मारले असल्याचे सांगितले. पोलिसांनी आकाशला शांत राहण्यास सांगून तेथून जाण्यास सांगितले. त्यावेळी आकाशने आम्हाला काही शिकवायचे नाही. समज द्यायची नाही. तुम्ही येथून गुपचूप निघून जायचे. असे बोलून आकाश हवालदार म्हात्रे, रामण्णाच्या अंगावर शिवीगाळ करत धावून आला. आपण राहुलभाई पाटीलची माणसे आहोत. आपल्या नादी लागायचे नाही. नाहीतर या भागात फिरू देणार नाही, अशी धमकी आकाश भोईरने पोलिसांना देऊन तेथून दुचाकीवरून पळ काढला.

कल्याण, डोंबिवलीत गुंडांची दहशत वाढू लागली आहे. भुरट्या चोऱ्या, घरफोड्या, पादचाऱ्यांना लुटण्याचे प्रकार वाढू लागले आहेत. शहरात कायदा सुव्यवस्था शिल्लक आहे की नाही असे प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत.

## संत निरंकारी मिशनच्या विद्यमाने वाशी येथे आयोजित

### मोफत आरोग्य तपासणी शिबिरात ३३३ गरजू नागरिक लाभान्वित

**नवी मुंबई – संत निरंकारी मिशनची सामाजिक शाखा संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनच्या विद्यमाने रविवारी २२ सप्टेंबर रोजी संत निरंकारी सत्संग भवन, वाशी सेक्टर १९-डी येथे आयोजित मोफत आरोग्य तपासणी शिबिरात ३३३ गरजू नागरिक लाभान्वित झाले.**

या शिबिरामध्ये सामान्य आरोग्य तपासणी व्यतिरिक्त वक्ष तपासणी, मधूमेह, बालरोग, अस्थिव्यंग, फिजिओथेरपी, स्त्रीरोग, गर्भाशय कर्क रोग, हृद्य रोग, दंत परीक्षण, कान-नाक-घसा परीक्षण आणि मॅमोग्राफी इत्यादि आरोग्याबाबतच्या विविध क्षेत्रातील तज्ञ डॉक्टरांनी नागरिकांची तपासणी करुन त्यांना उचित उपचारांसह आवश्यक ते मार्गदर्शनही केले.

आरोग्य तपासणी करणाऱ्या टीममध्ये १६ एमबीबीएस/बीएएमएस डॉक्टर्स व्यतिरिक्त १० वैद्यकीय तंत्रज्ञ तसेच ३८ कायरोप्रॅक्टिक/एक्युप्रेशर/एक्युपंक्चर टीमच्या सदस्यांनी भाग घेतला. गुणवंत फाउंडेशनच्या टीमकडून कर्क रोगाला दूर ठेवण्यासाठी जनजागृती केली.

या शिबिराचे उद्घाटन करताना डॉ.दर्शन सिंह जी, को-ऑर्डिनेटर, प्रचार-प्रसार, मुंबई व महाराष्ट्र यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की निरंकारी सद्गुरु माता सुदीक्षा जी महाराज यांच्या मानवसेवा हीच ईश्वर पूजा या पावन शिकवणूकीला अनुसरुन मानवता व विश्वबंधुत्वाच्या उदात्त आध्यात्मिक कार्यांबरोबरच स्वास्थ्य, समृद्धी व सशक्तीकरण आदि ध्येये समोर ठेऊन संत निरंकारी मिशन विविध सामाजिक सेवांमध्ये आपले सातत्याने योगदान देत आहे. शिबिराचा लाभ घेणाऱ्या नागरिकांच्या प्रति आपल्या शुभकामना व्यक्त करताना ते म्हणाले, की सर्वांचे जीवन तनाने स्वस्थ आणि मनाने निर्मळ राहावे.

संत निरंकारी मंडळाचे स्थानिक मुखी श्री.अनिल शिंदे यांच्या देखरेखीखाली स्थानिक सेवादल युनिट व संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनच्या स्वयंसेवकांच्या सहयोगाने या शिबिराचे यशस्वीरित्या आयोजन करण्यात आले.

## अंध दाम्पत्याचे बाळ परस्पर दत्तक !

### प्रसूतीनंतर अंध महिलेला स्तनपान बंद करण्याच्या दिल्या गोळ्या

**ठाणे – कल्याण तालुक्यातील मोहना गोळेगाव येथील एका अंध दाम्पत्याची फसवणूक करून त्यांना कोणत्याही स्वरूपाची माहिती न देता त्यांचे नवजात बाळ छत्तीसगड राज्यातील एका जोडप्याला परस्पर दत्तक दिल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी अंध दाम्पत्याने तक्रार केल्यानंतर जिल्हा महिला बाल विकास विभागाच्या वतीने हस्तक्षेप केल्यानंतर मोहने येथे गणपती नर्सिंग होम नावे दवाखाना चालवणाऱ्या अनुराग धोनी या डॉक्टर विरुद्ध बेकायदेशीररित्या बाळ दत्तक प्रक्रिया राबविल्याबद्दल खडकपाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून डॉक्टरला अटक करण्यात आली आहे.**



कल्याण तालुक्यातील मोहना गोळेगाव येथे एक अंध दाम्पत्य राहते. या दाम्पत्याला एक मुलगा आणि मुलगी अशी दोन मुले आहेत. यातील अंध महिला पुन्हा तिसऱ्यांदा गर्भवती राहिल्याने ते गावातील गणपती नर्सिंग होम येथे डॉक्टर अनुराग धोनी यांच्याकडे तपासणीसाठी गेले. यावेळी त्यांना हे बाळ नको असल्याचे त्यांनी डॉक्टर धोनीला सांगितले. मात्र आता तुम्ही तीन महिन्यांच्या गरोदर असून गर्भपात करता येणार नसल्याचे डॉक्टर धोनीने त्या अंध दाम्पत्याला सांगितले. मात्र तुम्ही या बाळाला जन्म दिल्यानंतर माझ्या परिचयातील इच्छुक पालकांना दत्तक देऊ शकतात. त्या मोबदल्यात ते पालक तुमचा सर्व रुग्णालयाचा खर्च आणि तुमच्या दोन्ही मुलांच्या शिक्षणासाठी अर्थ साहाय्य करतील असे सांगितले. कायदेशीर प्रक्रिया माहिती नसल्याने अंध दाम्पत्याने त्यास संमती दिली. मात्र मागील महिन्यात प्रसुती झाल्यानंतर अंध दाम्पत्याशी संवाद न साधता ते बाळ डॉक्टर धोनीने छत्तीसगड येथील कौर नामक दाम्पत्याला थेट देऊन टाकले. यानंतर संबंधित अंध दाम्पत्याने अर्थ साहाय्य आणि रुग्णालयाच्या खर्चाविषयी विचारणा केली असता डॉक्टरने ते देण्यास साफ नकार दिला. यामुळे आमचे बाळ आम्हाला परत द्या, आम्ही त्याचा सांभाळ करू असे सांगितले. मात्र डॉक्टरने बाळ देण्यासह नकार दिला.

हा संपूर्ण प्रकार अंध दाम्पत्याच्या शेजारील कुटुंबाला कळला असता त्यांच्या मदतीने एक ते दोन आठवड्यांनी बाळ पुन्हा अंध आई वडिलांच्या ताब्यात घेण्यात आले. यानंतर जिल्हा महिला बाल विकास विभागाला हा प्रकार कळताच त्यांनी हस्तक्षेप करून डॉक्टर विरुद्ध कारवाई करण्यास सुरुवात केली. याच पार्श्वभूमीवर डॉक्टर अनुराग धोनी विरुद्ध बेकायदेशीररित्या बाळ दत्तक प्रक्रिया राबविल्याबद्दल खडकपाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अटक करण्यात आली आहे. तर त्याने याआधीही अशाच पद्धतीने काही जणांची फसवणूक केल्याची दाट शक्यता वर्तविण्यात येत आहे.

या अंध दाम्पत्याची फसवणूक केल्यानंतर डॉक्टर अनुराग धोनी याने प्रसूतीनंतर संबंधित अंध महिलेला स्तनपान बंद होण्याच्या अर्थातच दूध बंद होण्याच्या गोळ्या दिल्या असल्याचाही धक्कादायक प्रकार तपासादरम्यान समोर आला आहे. यामुळे अशा पद्धतीचे अतिशय धक्कादायक आणि निंदनीय कृत्य करणाऱ्या डॉक्टर विरोधात कठोर कारवाई करण्यात येत असून या प्रकरणाचा अधिक सखोल तपास केला जात असल्याची माहिती जिल्हा महिला बाल विकास अधिकारी महेंद्र गायकवाड यांनी दिली आहे.

## आरक्षणासाठी धनगरांचा एल्गार! मुलुंड येथे भव्य मोर्चा



मुलुंड – धनगर समाजाला एसटीतून आरक्षण देण्यात यावे. त्याची तत्काळ अंमलबजावणी करण्यात यावी यामागणीसाठी तसेच पंढरपूर येथे उपोषणाला बसलेल्या धनगर बांधवाना पाठींबा देण्यासाठी सकल धनगर समाजाच्या वतीने मुलुंड येथे भव्य मोर्चा काढण्यात आला होता केले.

दरम्यान, महाराष्ट्र राज्यात धनगड जमात अस्तित्त्वात नसून त्या ऐवजी धनगर समाज आहेत, असे शपथपत्र राज्य सरकारने मुंबई उच्चन्यायालयात दिले आहे. त्या अनुषंगाने राज्य सरकारने धनगर आरक्षणाचा जीआर काढावा, मुंबई उच्च न्यायालयात धनगर एसटी आरक्षणाची केस सुरु होती. त्यामध्ये धनगड अस्तित्त्वात नाहीत, असे राज्य सरकारने शपथपत्र दिले होते. परंतु छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील फुलंब्री तालुक्यातील बाबरा या गावातील खिलारे नावाच्या बांधवांनी धनगडाचे बनावट दाखले काढल्याने धनगडाची राज्यातील शून्य संख्या अमान्य केली. म्हणून राज्य सरकारने तत्काळ धनगडाचे दाखले रद्द करावे, धनगर जमातीच्या एसटी आरक्षण अंमलबजावणीचा जीआर राज्य सरकारने तत्काळ काढवा, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

महाराष्ट्रातील जिल्हाधिकाऱ्यांना निर्गमित करावा व धनगड जमात राज्यात अस्तित्त्वात नसून अनुसुचित जमातीच्या यादीत ३६ नंबरला धनगड ऐवजी धनगर, असे गृहित धरुन धनगर जमातीला अनुसुचित जमातीचे दाखले वितरीत करण्यात यावेत, अशा मागणीचे निवेदन तहसिलदारांना देण्यात आले.तसेच धनगर समाजाच्या या मागणीला स्थानिक आमदार म्हणून मिहीर कोटेजा यांनी पत्र काढून पाठींबा जाहीर करावा अशी विनंती देखील समाजबांधवानी आमदार मिहीर कोटेजा यांना निवेदन देऊन केली.

याप्रसंगी, सकल धनगर समाजाच्या सहभागी कार्यकर्त्यांनी सरकार विरुध्द जोरदार घोषणा देत एसटीतून आरक्षण मिळालेच पाहिजे. अन्यथा आगामी काळात सरकारला याचे गंभीर परिणाम भोगावे लागतील, असा गर्भित इशारा दिला.



## जयपूर फूट शिबिराच्या माध्यमातून ७० दिव्यांगांना कृत्रिम अवयवांचा आधार

पनवेल – श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक मंडळ पनवेल, साधू वासवानी मिशन पुणे, भारतीय जनता पक्ष, रायगड जिल्हा मेडिकल असोसिएशन, फिनोलेक्स केबल्स लि. यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या जयपूर फूट शिबिराच्या माध्यमातून ७० दिव्यांगांना आधार मिळाला आहे.

मोफत कृत्रिम हात व पाय अर्थात जयपूर फूटसंदर्भात लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त ऑगस्ट महिन्यात शिबिर झाले होते. या शिबिरात हात, पाय नसलेल्या दिव्यांग व्यक्तींची तपासणी करून त्या अनुषंगाने कृत्रिम हात, पायासाठी मापे घेतली गेली होती. अशा व्यक्तींना हे कृत्रिम अवयव रविवारी पनवेल शहरातील मार्केट यार्ड येथील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात बसविण्यात आले.

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, उपाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमास माजी नगरसेवक अरुणकुमार भगत, भाजप सांस्कृतिक सेलचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अभिषेक पटवर्धन, जयपूर फूट प्रोजेक्ट हेड मिलिंद जाधव, साधू वासवानी मिशनचे प्रतिनिधी डॉ. सलील जैन, सुशील ढगे, श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि साधू वासवानी मिशन कॉर्डिनेटर डॉ. सचिन जाधव, मंडळाचे कार्यालयीन सचिव अनिल कोळी, श्याम पुंडे यांच्यासह इतर मान्यवर आणि पदाधिकारी उपस्थित होते.

## पनवेलमधील पाणी पुरवठा बंद



पनवेल: पनवेलमधील नागरिकांना पावसाळ्यातच पुढील चार दिवसांचे पाण्याचे नियोजन गुरुवारपासून करावे लागणार आहे. पनवेलला पाणी पुरवठा करणाऱ्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने (म.जी.प्र.) याबाबतची सूचना नोटीस पनवेल महापालिका, सिडको मंडळ, विविध ग्रामपंचायतींना दिली आहे. गुरुवारी सकाळी नऊ वाजल्यापासून ते शुक्रवारी सकाळी नऊ वाजेपर्यंत पाणी पुरवठा बंद राहणार म.जी.प्र.ने भोकरपाडा पंपस्टेशनमधील आाणि जलवाहिनीवरील दूरुस्तीचे कामे हाती घेतल्यामुळे २४ तास हा पाणी पुरवठा बंद राहणार आहे. शुक्रवारी पाणी पुरवठा सूरु झाल्यानंतर शनिवार व रविवारपर्यंत पुढील दोन दिवस कमी दाबाने पाणी पुरवठा होणार असल्याने पनवेल शहरासह विविध सिडको वसाहतींमधील आणि गावांमधील नागरिकांनी पुढील पाच दिवस पिण्याच्या पाण्यासाठी साठवणूक करावी, तसेच पाण्याचा जपून वापर करावा असे आवाहन म.जी.प्र.च्या अधिका-यांनी केले आहे.

- महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे उपविभागीय अभियंता आर. टी. वायदंडे यांनी दिलेल्या सूचनापत्रामध्ये विद्युत व स्थापत्य विभागाची दुरुस्ती न्हावाशेवा पाणी पुरवठा केंद्रामधून होणाऱ्या जलवाहिनी व इतर कामे हाती घेतली जाणार असल्याने हा पाणी पुरवठा बंद राहणार आहे.
- यामध्ये भोकरपाडा पंपींग स्टेशनमधील पंप क्रमांक तीनच्या ठिकाणी नवीन बसविण्यात आलेल्या ८८५ अश्वशक्ती पंपाचा डिलेव्हरी पाईप पंपला जोडणे, तसेच या पंपींग स्टेशनमधील जुना पंप क्र.४ चे संपवेलमध्ये पडलेला पंप (बाउल असेम्ब्ली व कॉलम पाईप असेम्ब्ली) काढुन घेणे. पंपीग स्टेशन मधील जुना ब्रेकर पॅनेल नादुरुस्त झाल्याने त्याठिकाणी नविन बसविण्यात आलेला पॅनेल चार्ज करुन वीजवाहिनी जोडुन चालु करून घेणे. वायाळ पंपींग स्टेशनमध्ये नविन ८८५ अश्वशक्ती पंपाचे बेरिंग नवीन बसविणे.
- भोकरपाडा अस्तित्वातील जलशुध्दीकरण केंद्रातील शटडाऊन अनुषंगाने असलेली इतर कामे करणे. भोकरपाडा येथे एक जुना एच. टी. ट्रान्सफॉर्मर काढून त्या ठिकाणी नवीन २२/३.३ केव्हीचा एच. टी ट्रान्सफॉर्मर बसविणे व त्याची रंगीत तालिम घेणे, वायाळ केटी वेअर येथे गेट बसविणे. वायाळ ते भोकरपाडा उर्ध्ववाहिनीवरील गळत्या दुरुस्ती करणे. जलशुध्दीकरण केंद्रातील नियमित दुरुस्तीची कामे. १३२० मिलीमीटर व्यासाच्या गुरुत्व वाहिनीवरील कळंबोली स्टील मार्केट, पनवेल रेल्वे कॉलनी, पनवेल रेल्वे स्टेशन, पोदी कनेक्शन जवळ, शांतीवन, नॅशनल हार्मोनी जवळ, ठोंबरेवाडी व समतानगर येथील गळत्या दुरुस्तीची कामे मजीप्रचे कर्मचारी करणार आहेत.

## शिवसेना कळवा शहर आयोजित मोफत मधुमय व रक्तदाब चाचणी शिबिर

कळवा -:महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री श्री एकनाथजी शिंदे यांच्या आदेशानुसार आणि खासदार डॉ श्रीकांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली खारीगाव येथे द लायन्स क्लब ऑफ प्लॅटिनम व शिवसेना कळवा शहर यांच्या संयुक्त विद्यमानाने मोफत मधुमेह व रक्तदाब चाचणी शिबिराचे आयोजन श्री महेश गवारी – शाखाप्रमुख ह्यांनी आशर आरिया खारीगांव येथे करण्यात आले होते या शिबिराचे उद्घाटन उद्योजक समाजसेवक श्री लक्ष्मण कदम यांच्या हस्ते करण्यात आले.

'महाराष्ट्र सम्राट' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक चंद्रकांत शंकरराव भोईटे यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नंबर – डब्लू २३० टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरिया, कोपर खैरणे, एम.आय.डी.सी., ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई – ४००७१० येथे छापून ३०२, हार्मोनी टॉवर, भारत ज्वेलर्स समोर, नेताजी सुभाष चंद्र रोड, कोर्ट नाका, ठाणे पश्चिम – ४००६०१ (महाराष्ट्र ) येथे प्रकाशित केले. संपादक – चंद्रकांत शंकरराव भोईटे ■ RNI - MAHMAR/2012/44140 ■ मो. नं. : +९१-९१६७९५७७७१